अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ४७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# पाटलांच्या पोरांना लग्नाअगोदर पोरं पाटील म्हणून घ्यायची लाज वाटते

## राजन पाटील | उमेश पाटील

**निवडणूक मोहोळ-पंढरपूर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या भीमा सहकारी साखर कारखान्याची. एका बाजूला आहे सत्ताधारी कोल्हापूरचा महाडिक गट; दुसऱ्या बाजूला आहे विरोधी अनगरचा राजन पाटील व पंढरपूरचा परिचारक गट. दोन्ही बाजूने प्रचारात उतरली आहे दोन्ही गटातील नेत्यांची पुढची पिढी. या पुढच्या पिढीतील पोरांवरूनच पोरांच्या पालकांनी नको ती वक्तव्ये केल्यामुळे निवडणुकीचा प्रचार नको त्या पातळीवर पोहचला आहे. त्यातूनच राष्ट्रवादी काँग्रेसचे मोहोळचे माजी आ. राजन पाटील यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर राष्ट्रवादीचेच प्रवक्ते व मोहोळमधील माजी जि.प.सदस्य उमेश पाटील यांनी जोरदार टीका केल्यामुळे निवडणूक प्रचाराला व्यक्तिगत हेवेदाव्यांचा रंग आला आहे.**

✔ सोलापूर : 'गेल्या आठ दिवसांपासून फक्त आमच्या कुटुंबीयांवर टीका केली जात आहे. दुसरी काही भानगडच नाही. प्रशांतमालक (परिचारक) तुम्ही आज आला आहात. निवडणूक भीमा कारखान्याची आहे की राजन पाटील यांच्या कुटुंबीयांची आहे, हे कळायला मार्गच नाही. आम्ही पाटील आहे. आमच्या पोरांना बाळं म्हणत आहेत. अरं आम्ही पाटील आहोत. त्यांना माहितीच नाही की, पाटलांच्या पोरांनाही लग्नाच्या आधी एवढी बाळं असतात बेट्या....तुझ्याएवढी... आणि त्याचा आम्हाला स्वाभिमान आहे,' हे विधान आहे तब्बल तीनवेळा आमदार म्हणून विधानसभेत गेलेले राजन पाटील यांचे. तेसुध्दा जाहीर सभेत केलेले. याच विधानावरून आता विरोधकांवर टीका करणारे माजी आ. राजन पाटील स्वत: टीकेचे धनी झाले आहेत.


शुक्रवारी भीमा कारखाना निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस होता. एका जाहीर प्रचार सभेत भीमा कारखान्याचे अध्यक्ष खा. धनंजय महाडिक यांच्यावर तोंडसुख घेताना माजी आ. राजन पाटील यांनी हे विधान केले आहे. दरम्यान राजन पाटील यांच्या याच वक्तव्यावरून त्यांच्याविरोधात कारवाई करावी, अशी मागणी पुढे आली आहे. राजन पाटील यांच्यासारख्या जुन्या-जाणत्या नेत्यांकडून केलेल्या बेताल वक्तव्याचे राजकीय क्षेत्रात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



स्वत:च्या पोरांची गुन्हेगारी पार्श्वभूमी अभिमानाने सांगताना 'आमच्या पोरांना बाळं म्हणत आहेत... तुम्ही आमच्या पोरांना भीती घालताय? अहो, वयाच्या सतराव्या वर्षी ३०२ ची कलमं भोगणारी आमची पोरं आहेत... तुम्ही आम्हाला काय भीती घालताय...?'
- राजन पाटील
(राष्ट्रवादीचे माजी आमदार)

✔ **सोलापूर** : 'आमच्या नेत्याची दोन पोरं प्रचारात आहेत. त्यांनी भाषणात सांगितलं की, आमच्या पोरांना लग्नाच्या अगोदरच पोरं झालेली आहेत. एवढंच नाही तर आम्हाला त्याचा स्वाभिमान आहे, असंही ते म्हणाले. लग्नाच्या अगोदर स्वत:च्या पोरांना आधीच पोरं झाली आहेत, असे सांगणारे हे पाटील. आम्हीसुध्दा पाटील आहोत. पण अशा पाटलांमुळे आम्हाला आता पाटील म्हणवून घ्यायलाही लाज वाटते', असे सांगून 'हा एक प्रकारे महिलांचा सुध्दा अपमान आहे. असा असंस्कृत, विकृत मनोवृत्तीचा माणूस तुम्हाला भीमा कारखान्याचा नेता म्हणून चालणार आहे का? असा सवाल माजी आ. राजन पाटील यांचे विरोधक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.


भीमा कारखाना निवडणुकीच्या प्रचार सभेतच उमेश पाटील यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे. यावेळी पुढे बोलताना,'त्यांनी पुढं आणखी सांगितलं की लग्नाच्या आधी जी पोरं झाली आहेत, ती तुमच्या वयाची आहेत, असे सांगितले. म्हणजे बापच पोरांच्या नावाने बिल फाडत होता की काय माहीत? वयाच्या २४ ते २५ व्या वर्षी लग्नं झाली. त्या अगोदरच त्यांच्या पोरांना पोरं झाली आणि ती पोरं आता तुमच्या वयाची झाली आहेत. म्हणजे ते स्वत:ची बिलं पोरांच्या नावाने फाडत आहेत. काय नेते...? असा सवालही उमेश पाटील यांनी उपस्थित केला.



मोहोळ तालुक्यातील जनतेच्या सहनशीलतेची मलाच कीव येऊ लागली आहे. असला नेता मोहोळ तालुक्याने तीनवेळा निवडून दिला. असला नेता मोहोळ तालुक्याच्या बोकांडी बसला. असला विकृत मनोवृत्तीचा माणूस, घाणेरडा माणूस मोहोळचा असेल तर आम्हाला तालुक्याचा म्हणून घेताना लाज वाटेल. पाटील म्हणून सांगायला लाज वाटेल, असा नेता भीमा कारखान्यात तुम्हाला चालेल का?
- उमेश पाटील
(राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते)

## शाहरूख खानची तपासणी

✔ **मुंबई** : अभिनेता शाहरुख खानची मुंबई विमानतळावर त्याची अडवणूक करण्यात आली आहे. शाहरुख खान शारजाहवरून परत येत असताना त्याला कस्टम अधिकाऱ्यांनी रोखले आणि त्याची चौकशी केली. कस्टम ड्युटी न भरल्याने ही चौकशी करण्यात आली आहे. एअर इंटेलिजेंस युनिटनुसार



त्याच्याकडे महागडया घडाळ्यांची कव्हर्स होती ज्याची किंमत जवळपास १८ लाख आहे, ज्याचे कस्टम शुल्क आहे ६. ८३ लाख. अभिनेत्याने ही रक्कम दंड स्वरूपात भरली असून कस्टम अधिकाऱ्यांना सहकार्यदेखील केले आहे.

## भर रस्त्यावर काठीने मारहाण; डॉ.आडके यांच्याविरुद्ध गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

हॉस्पिटल मधून अंगावर पाणी का टाकले? याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या इसमाला डॉक्टराने गुंडा स्टाईलने हाताने आणि फायबर काठीने बेदम मारहाण करून जखमी केले.

ही घटना सदर बाजार परिसरातील आडके हॉस्पिटल समोर शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात सदर बाजारच्या पोलिसांनी डॉ.संदीप आडके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. विजय रणसिंग चौधरी (वय ५८ रा.उ. सदर बाजार, बेडरपूल) असे जखमी मजुराचे नाव आहे. ते शनिवारी सकाळी१० वाजेच्या सुमारास आडके हॉस्पिटल समोरून घराकडे पायी जात होते. त्यावेळी हॉस्पिटलच्या वरच्या मजल्यावरून त्यांच्या अंगावर कोणीतरी पाणी टाकले. तेव्हा त्यांनी हॉस्पिटल समोर थांबून याची विचारणा केली. तेव्हा डॉ.आडके हे तावातावाने बाहेर येऊन त्यांना हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली.




डॉक्टराचा हा वेगळाच अवतार पाहून पाहून आजूबाजूच्या लोकांनी भांडण सोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा डॉक्टरांनी त्यांना काठी उगारून, तुम्ही मध्ये पडलात तर तुमचे पाय तोडीन अशी धमकी दिली. त्यानंतर जखमी चौधरी यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद पोलिसात झाली आहे.


## विवाहितेची आत्महत्या

✔ **सोलापूर** : दारुड्या पतीच्या त्रासाला कंटाळून एका ३८ वर्षीय विवाहितेने विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना हंजगी (ता.अक्कलकोट) येथे घडली. वैशाली सिद्धाराम कोळी (वय ३८ रा. हंजगी) आणि असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे त्याचे नाव आहे. तिचा पती सिद्धाराम हा रोज दारू पिऊन घरात येत होता. त्यास कंटाळून तिने कीटकनाशक प्राशन केली होती. तिला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारारा दरम्यान पहाटे मरण पावली.

## पेनूरजवळ टेम्पो ट्रॅव्हलची कारला धडक; पंढरपुरातील तीन युवक ठार

✔ **मोहोळ** : विरुद्ध दिशेने येणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हलरने ॲमेज कारला जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे जण जखमी झाले. हा अपघात पंढरपूर मोहोळ पालखी मार्गावरील पेनुर हद्दीतील एका पेट्रोल पंपासमोर शुक्रवारी रात्री दहा वाजता झाला. प्रशांत एकनाथ शेटे (वय ३५), सूरज दिलीप कदम (वय २५), ऋषिकेश रामकृष्ण साखरे (वय २५, तिघेही रा. विजापूर गल्ली, पंढरपूर) अशी मृतांची नावे आहेत, तर दत्तात्रेय श्रीमंत कोकाटे (रा. तांबोळे), व दत्तात्रय बाळासाहेब देवकते (रा. कोन्हेरी) अशी जखमींची नावे आहेत.

जखमींना पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात दाखल केले आहे. वरील तिघे पंढरपूरहून अमेज कारमधून (एम. एच. १३ डी.एम. ९५६२) मधून पंढरपुराहून सोलापूरला शोरूम ला जाऊन येतो असे सांगून घरातून सकाळी गेले.



रात्री उशिरा परत येताना त्यांची कार पंढरपूर-मोहोळ पालखी मार्गावरील पेनुर हद्दीतील एका पेट्रोल पंपाजवळ आली असता त्याच वेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हलरने (एमएच १३ ए एक्स ४४५) कारला जोराची धडक दिली. त्यात वरील तिघाजणांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला, तर अन्य दोघेजण जखमी झाले. या अपघाताची फिर्याद दत्तात्रय नारायण जाधव (वय ६५, रा लोकमान्य नगर ठाणे) यांनी मोहोळ पोलिसात दिली आहे. अधिक तपास अपघात पथकाचे पोलीस उपनिरीक्षक जयंत पवार करीत आहेत.



**संकष्टी चतुर्थीनिमित्त शनिवारी शहरातील कसबा गणपतीला ५६ भोग नैवेद्य दाखवण्यात आला होता.**

## गोळीबार करून २८ लाख केले लंपास

✔ **पुणे** : पुण्यात मार्केट यार्ड परिसरात गोळीबार करण्यात आला आहे. गोळीबार करून लूटमार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यावेळी गोळीबार करत २८ लाख रुपयांची रक्कम घेऊन आरोपी फरार झाले आहेत. ५ ते ६ आरोपी पी.एम. अंगडिया कार्यालयातून पसार झाले आहेत. पोलीस याप्रकरणी सध्या तपास करत आहेत. मात्र, भरदिवसा झालेल्या या गोळीबाराच्या घटनेने पुण्यात दहशतीचे वातावरण आहे.

घटनेची माहिती मिळताच मार्केट यार्ड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मार्केट यार्ड परिसरात पी.एम. अंगडिया यांचं कार्यालय आहे. ते कुरिअर कार्यालय असल्याची माहिती आहे. शनिवारी याठिकाणी ४ ते ५ जण आले त्यांनी गोळीबार केला आणि तब्बल २८ लाखांची रोकड पळवून नेली. तक्रारदार हे सकाळी ११ वाजताच्या दरम्यान त्यांच्या ऑफिसमध्ये आलेले होते. आल्यानंतर त्यांनी कॅश चेक केली. त्यानंतर पावणे १२ च्या सुमारास ५ आरोपी आले त्यांनी दारातून पिस्टल



दाखवली. त्यानंतर दुसऱ्या साथीदाराने त्यांनी खोलीतून ढकलून बाहेर काढले, मध्ये जी ग्लास होती, ती गोळीबार करून फोडली, त्यानंतर पाचही आरोपींनी आत येऊन रक्कम घेऊन गेले, अशी माहिती मार्केट यार्ड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनघा देशपांडे यांनी दिली. यामध्ये अद्याप कोणीही जखमी असल्याची माहिती नाही. सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले. या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इथ विमानसेवा नाही, अन् तू पाऊस-पाणी घेऊन बसलास!

कल्याण
126-92-679

## कार्तिकी यात्रेत मंदिर समितीला ३ कोटींचे उत्पन्न

✔ सुराज्य/पंढरपूर

नुकत्याच पार पडलेल्या कार्तिकी यात्रेमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस विविध मार्गाने एकूण ३ कोटी २० लाख ५९ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मंदिर समितीच्या उत्पन्नात तब्बल सव्वा कोटींनी वाढ झाली आहे. दरम्यान यंदा वारीकाळात ३ लाख १२ हजार भाविकांनी विठुरायाचे पदस्पर्श दर्शन घेतले.



यंदा कार्तिकी वारीमध्ये तुलनेने कमी गर्दी असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते. मात्र तरीही भाविकांनी भरभरून दान विठ्ठल रुक्मिणीच्या चरणावर अर्पण केले. विठुरायाला आज देखील गरिबांचा देव मानले जाते. कारण येथे येणारा बहुतांश वर्ग सर्वसामान्य व शेतकरी असतो. यामुळे गर्दी बाबत हे राज्यातील सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असले तरी उत्पन्नाच्या बाबतीत सर्वात मागे असणारे देवस्थान आहे. मात्र वारकऱ्यांच्या श्रद्धेला तोड नसते. यामुळेच एकादशी दिवशी तब्बल अठरा ते वीस तास दर्शन रांगेत थांबून ३९ हजार ८७१ भाविकांनी विठ्ठलाचे चरण दर्शन घेतले. तर ४३ हजार ८१० जणांनी विठ्ठल रुक्मिणीचे मुखदर्शन घेतले.

दरम्यान यंदा विठ्ठलाच्या चरणावर २४ लाख ७४ हजार रुपये तर रुक्मिणीच्या चरणावर ९ लाख ४१ हजार रुपये वारकऱ्यांनी अर्पण केले. मागील वर्षी कार्तिकी यात्रा झाली परंतु कोरोनामुळे केवळ मुखदर्शन सुरू होते. यामुळे मागील वर्षी चरणावरील दक्षिणा अर्पण करण्यात आली नाही. विविध देणगी पावतीद्वारे यंदा १ कोटी ६ लाखांचे दान तर मागील वर्षी ५९ लाख ७३ हजार रुपये देणग्या प्राप्त झाल्या होत्या. प्रसादाच्या लाडू विक्रीतून यंदा ३९ लाख ४६ हजार तर राजगिरा लाडू मधून ५ लाख २१ हजार रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. मागील वर्षी लाडू विक्री बंद होती. विठ्ठल रुक्मिणी भक्त निवासाद्वारे समितीस १७ लाख २७ हजार उत्पन्न मिळाले असून मागील वर्षी हा आकडा १५ लाख रुपये होता. ऑनलाईन देणगी यंदा १७ लाख रुपयांची प्राप्त झाली असून मागील वर्षीच्या तुलनेत यामध्ये ८ लाखांची वाढ झाली आहे. देवाला १२ लाख रुपयांचे विविध प्रकारचे सोन्याचे दागिने तर १ लाखाचे चांदीचे दागिने प्राप्त झाले आहेत.

### उत्पन्न घटले

या वर्षी हुंडी पेटीमधील उत्पन्न मागील वर्षीच्या तुलनेत २० लाखांनी घटले आहे. यंदा हुंडी पेटीतून ४८ लाख ९१ हजार रुपये प्राप्त झाले आहेत. यासह परिवार देवता समोर ही भाविकांनी मागील वर्षीच्या तुलनेत १३ लाख रुपये कमी दान दिले आहे. मागील वर्षी ३२ लाख तर यंदा १९ लाख रुपये प्राप्त झाले आहेत. फोटो विक्री व मोबाईल लॉकरचे उत्पन्न देखील घटले असल्याचे चित्र आहे.

सुराज्य
सोलापूर



पाहिजेत
ग्राफीक डिझायनर

- उमेदवार पदवीधर असावा.
- कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इन डिझाईन आवश्यक.
- पेज लेआऊट, सर्व प्रकारचे जाहिरात डिझाईन आणि मराठी टायपिंग अनिवार्य.
- रात्रपाळीत काम करण्याची तयारी असावी.
- आकर्षक पगार मिळेल.

ऑफीसचा पत्ता
१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३
Email : dailysurajyaoffice@gmail.com या ईमेलवर अर्ज करावेत!

# सोलापूर विद्यापीठास राष्ट्रीय स्तरावरील पब्लिक रिलेशन कौन्सिलचा पुरस्कार



✔ सुराज्य/सोलापूर

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे संकुलातील मास कम्युनिकेशन विभागाला पब्लिक रिलेशन कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेतर्फे राष्ट्रीय स्तरावरील 'बेस्ट कम्युनिकेशन स्कूल ऑफ द इयर' हा चाणक्य ज्युरी विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे.**

पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडिया ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी देशातील एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. या संस्थेने कोलकाता येथे ११ नोव्हेंबर २०२२ रोजी हॉटेल फेअरफिल्ड मॅरिएट येथे या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. जी. एस. कांबळे आणि मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर यांनी स्वीकारला. पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाचे संस्थापक एम. बी. जयराम आणि इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडिया ही जनसंपर्क व जाहिरात क्षेत्रात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी संस्था आहे. भारतातील विविध राज्यात तसेच संयुक्त अरब अमिरात, श्रीलंका इत्यादी देशातही या संस्थेच्या शाखा आहेत. या संस्थेतर्फे चाणक्य ज्युरी पुरस्कारांसाठी देशभरातून विविध प्रस्ताव मागविण्यात आले होते. या संस्थेने नेमलेल्या तज्ज्ञ समितीने आलेल्या प्रस्तावांची छाननी करून विविध निकषांच्या आधारे निवड केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाची 'कम्युनिकेशन स्कूल ऑफ द इयर' या पुरस्कारासाठी निवड करताना विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेले उपक्रम विद्यार्थ्यांसाठी सुविधा, सुरू केलेले विविध अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, विभागातर्फे मागील वर्षभरात आयोजित केलेले शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन इत्यादी निकषांच्या आधारे या चाणक्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. मास कम्युनिकेशन विभागाला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. राजेश गादेवार, कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखा अधिकारी श्रेणिक शहा, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर आदींनी अभिनंदन केले आहे.



# पुढची पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षण विभागावर : सीईओ स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

**समाजातील पुढची पिढी घडविण्याची जबाबदारी हे शिक्षकांचे असते त्यादृष्टीने शिक्षकांनी जबाबदारीने व पारदर्शकपणे कामे केली पाहिजेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शिक्षकांची कार्यशाळा झाली. जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी शिक्षण, एमआयएस कोऑर्डीनेटर यांच्या शिक्षण विभागातील कामकाजात सुधारणा कार्यशाळेत सीईओ स्वामी बोलत होते.

स्वामी म्हणाले की, 'तालुका स्तरावरील सर्व प्रलंबित प्रकरणे या महिनाअखेर पूर्ण करून पाठवा. जिल्हास्तरावर तातडीने त्यावर पुढील कार्यवाही केली जाईल. केंद्रप्रमुख व विस्तार अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर कार्यालयीन प्रशासन व कार्यक्षेत्रातील प्रशासन यामध्ये समन्वयक म्हणून भूमिका बजावणे अपेक्षित असताना असे होताना दिसून येत नाही.

शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र काही लोकांच्या गैरवागणुकीमुळे बदनाम होत असेल तर यापुढे अशा लोकांची गय केली जाणार नाही.

ऑनलाईन पोर्टलवर डाटा एन्ट्रीच्या कामात आपण राज्यात मागे आहोत. मी दोन वर्षांत जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढावी म्हणून सर्वात जास्त वेळ या विभागास दिला आणि अशा गलथान लोकांमुळे ते कुठेतरी वाया जात आहे. डिसेंबर अखेरपर्यंत सर्व पेंडन्सी क्लिअर करा जेणेकरून येणारे नवीन वर्ष गुणवत्ता वाढीचा किरण घेऊन उगवेल.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी सीईओ स्वामी यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील पाथरी येथे भेट दिली असता तेथील नागरिकांनी शिक्षक व इतर ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांविषयी तक्रारी केल्या होत्या. या संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा प्रस्ताव तातडीने माझ्याकडे पाठवा, असे आदेश यावेळी त्यांनी दिले.

यावेळी प्रभारी शिक्षणाधिकारी संजय जावीर, डाएटचे अधिव्याख्याता शशीकांत शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक शिक्षण विस्तार अधिकारी गुरव यांनी केले.

# हत्तुरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सर्वरोग निदान शिबिर



✔ सुराज्य/सोलापूर

सिद्रामप्पा मल्लप्पा हत्तुरे यांच्या १७व्या पुण्यस्मरणानिमित्त महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक श्रीशैल मामा हत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मातोश्री रखमाबाई हत्तुरे मंगल कार्यालयात सर्वरोग निदान व लसीकरण शिबिर झाले. महानगरपालिकेच्या मजरेवाडी नागरी आरोग्य केंद्र व हतुरे परिवार तसेच टीसीआय फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शिबिर संपन्न झाले.

या शिबिरामध्ये कोविड-१९, लंपी लस तसेच नेत्र तपासणी, दंत तपासणी, आरोग्य तपासणी, बालरोग तपासणी, टीबी तपासणी, रक्त, शुगर, बीपी तपासणी तसेच औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिर माजी नगरसेवक वैभव श्रीशैल हतुरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या शिबिरात २७० हून अधिक नागरिकांनी सहभागी नोंदवला.

यावेळी महानगरपालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मजरेवाडी नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजयकुमार चौगुले तसेच शेख जे. एम., शेख एन. एफ., कांबळे व्ही. जी, आंधळकर आर. बी., गोटे जी. एस., बावगे बी. जे., गोला के. बी, रोपेल्ली एम. एस., देशपांडे एस. डी., गिरे एम. एस., रोहित भालेराव व शिवलीला अष्टगी, किशोर झेंडेकर, सुरेश कामशेट्टी, महादेव पाटील, सचिन कोठाणे, सुरेश वंदाले, परमेश्वर गुब्याड, दीपक हरवाळकर, निगया स्वामी, उमाकांत मुजगोंड, शुभम हसनापुरे, विशाल ताकमोगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शहर काँग्रेसतर्फे मौलाना आझाद यांना अभिवादन

✔ सुराज्य/सोलापूर : शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने भारताचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना आझाद यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसभवन सोलापूर येथे त्यांच्या प्रतिमेस शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश वाले यांच्या हस्ते नगरसेवक हाजी तौफिक हत्तुरे यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोलापूर शहर अल्पसंख्याक सेल अध्यक्ष नगरसेवक तौफिक हत्तुरे, महिला अध्यक्ष हेमा चिंचोळकर, किसन मेकाले गुरुजी, देविदास गायकवाड, अंबादास गुत्तीकोंडा, तिरुपती परकीपंडला, अनिल मस्के, पशुपती माशाळ, सुमन जाधव, प्रमिला तुपलवंडे, आदि उपस्थित होते.

# दहिगाव येथे वार्षिक रथोत्सव व सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन

✔ सुराज्य/नातेपुते

**सालाबादप्रमाणे श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन अतिशय क्षेत्र वार्षिक रथोत्सवास दहिगाव येथे १३ नोव्हेंबर रोजी रथोत्सवाची सुरुवात होत आहे. या सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**



सकाळी ९ वाजता परमपूज्य १०८ मुनीश्री शुभंकीर्ती महाराज यांच्या उपस्थितीत स्व. श्री चंद्रकांत जीवराज गांधी पिलीव यांच्या स्मरणार्थ प्रगती चंद्रकांत गांधी व समता प्रशांत गांधी, प्रज्योती शितल गांधी दहिगाव व गांधी परिवार यांच्यावतीने भगवान श्री यांचा अभिषेक होऊन तसेच मंदिरामध्ये संगीतमय भक्तीमय विधान, दु. २ वाजता २५ वर्षानंतर नूतनीकरण केलेल्या पाच मजली लाकडी धर्मरथाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यंदा रथयात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून ते ४ वाजेपर्यंत सर्व रोग निदान शिबिर व संगीतमय बोलिया अभिषेकचे आयोजन, कार्तिकी वैद्य सात दि. १५ रोजी सुशोभित धर्मरथामध्ये श्री १००८ भगवान महावीर स्वामी यांची मूर्ती विराजमान करून सालाबादप्रमाणे शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे मार्गदर्शक डॉ. उदयकुमार दोशी, डॉ. वर्धमान दोशी, डॉ. प्रशांत गांधी तसेच संयोजक डॉ. तेजस चंकेश्वर गोमटेश दोशी हे शिबिराचे नियोजन करत आहेत. शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टर श्रेणिक शहा यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ डॉक्टर शिबिरासाठी महावीर सेना नातेपुते, आराधना महिला मंडळ चंद्रप्रभू पतसंस्था, केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशन महती सेना दहिगाव, ब्रह्म महती महिला मंडळ, दहिगाव चंद्रप्रभू एज्युकेशन सोसायटी नातेपुते अहिंसा सेवा समिती, नातेपुते सकल जैन समाज यांचे सहकार्य लाभले आहे.

# शावळ येथे वडिलांचा खून; मुलीला उच्च न्यायालयात जामीन

✔ सुराज्य/सोलापूर

येथे दुर्योधन रामण्णा डुमगणे यांचा खून केल्याप्रकरणातील मयताची मुलगी महानंदा सिद्धप्पा पुजारी हिस जामिनावर सोडण्याचे आदेश उच्च न्यायालयाचे न्या. एन. आर. बोरकर यांनी नुकतेच दिले. आरोपी महानंदा हिचे दुसऱ्या आरोपी बरोबर प्रेमसंबंध होते. या प्रेमसंबंधास मयत दुर्योधन व फिर्यादी भुताळी डुमगणे हे नेहमी विरोध करत होते. त्यामुळे आरोपी महानंदा आणि फिर्यादी भुताळी व दुर्योधन यांच्यामध्ये नेहमी भांडण होत असे. तर इतर आरोपी देखिल फिर्यादीस नेहमी दमदाटी करत होते. २५ जुलै २०१९ रोजी आरोपी ही फिर्यादीकडे येऊन वडिलांना बरे वाटत नाही. त्यांना दवाखान्यात घेऊन जायचे आहे असे म्हणून नेण्यास आली. घरी जाईपर्यंत लोकांची भरपूर गर्दी झाली होती. नातेवाईक रडत बसले होते. त्यानंतर अंत्यविधी करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आरोपी हे आपसात खून केल्याची चर्चा करत होते. हे बोलणे फिर्यादीने ऐकले व त्यानंतर अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध खून केल्याचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी महानंदा पुजारी आनि इतर साथीदारांना अटक केली. महानंदा हिचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर तिने मुंबई उच्च न्यायालय जामीन अर्ज दाखल केला. युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायमूर्ती बोरकर यांनी आरोपीस जामीनावर सोडण्याचे आदेश दिले. आरोपीतर्फे ॲड विक्रांत फताटे तर सरकारतर्फे ॲड कापडणीस यांनी काम पाहिले.

## भीमाशंकर वैदकर यांचे निधन



✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील भिमाशंकर सिद्रामप्पा वैदकर यांचे वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, चार सुना, एक भाऊ, भावजय व नातवंडे असा परिवार आहे.

# राशीभविष्य

## दि. १३ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२२

### मेष

आर्थिक बाबींसाठी हा आठवडा शुभ असून धनलाभही भरपूर होईल. या आठवड्यात तुमच्या संयमामुळे आर्थिक बळाकडे वाटचाल होताना दिसते. कामाच्या ठिकाणी तुम्ही जितके अधिक पुढे विचार कराल तितके चांगले. या आठवड्यात केलेल्या प्रवासातूनही शुभ संकेत प्राप्त होतील आणि प्रवास यशस्वी होतील. तुम्हालाही कुटुंबासोबत प्रवास करायचा असेल.

**शुभ दिवस : १४,१६,१९**

### वृषभ

हा आठवडा तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक असू शकतो. कामाच्या ठिकाणी धीर सोडू नका आणि अहंकारामुळे होणारा संघर्ष टाळलात तर बरे होईल. मेहनत करून एखादे पद मिळविलेल्या व्यक्तीमुळे तुमचा प्रोजेक्ट डिस्टर्ब होऊ शकतो. जेव्हा तुम्ही तुमच्या बोलण्यावर विश्वास ठेवता आणि कोणत्याही निर्णयावर पोहोचता तेव्हाच आर्थिक बाबतीत प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल. सप्ताहाच्या शेवटी काही बातम्या मिळाल्याने मन उदास होऊ शकते.

**शुभ दिवस : १६**

### मिथुन

कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण होतील आणि या आठवड्यात तुमच्या कार्यक्षेत्रात काही पितृतुल्य व्यक्ती तुम्हांला साथ देईल. आर्थिक फायद्यासाठी मजबूत परिस्थिती निर्माण केली जात आहे आणि तुमचे प्रियजनदेखील या आठवड्यात तुमची संपत्ती वाढविण्यात मदत करू शकतात. कुटुंबाशी संबंधित आर्थिक बाबींमध्ये निष्काळजीपणा तुम्हाला महागात पडू शकतो. या आठवड्यात प्रवास पुढे ढकलणे चांगले. आठवड्याच्या शेवटी, भागीदारीच्या कोणत्याही कामात यश मिळेल, परंतु तरीही मन अस्वस्थ राहील.

**शुभ दिवस : १२,१४,१६**

### कर्क

या आठवड्यात प्रवास केल्याने विशेष यश प्राप्त होईल आणि तुम्ही एखाद्या रमणीय ठिकाणी प्रवास करण्याचा विचार देखील करू शकता. कुटुंबातील महिला वर्ग पुढे जाऊन तुम्हांला खूप साथ देईल आणि तुम्ही कुटुंबाच्या सहवासात आनंददायी वेळ घालवाल. आर्थिक बाबतीत, या आठवड्यात काही त्रास वाढू शकतात आणि तुमच्या गुंतवणुकीबाबत तुमच्या मनात काही चिंता असू शकते. कामाच्या ठिकाणी थोडा धोका पत्करून पुढे गेल्यास चांगले परिणाम दिसून येतील. आठवड्याच्या शेवटी एक नवीन सुरुवात तुमच्या जीवनात आनंद आणि सुसंवाद आणेल आणि तुम्ही पार्टी मूडमध्ये असाल.

**शुभ दिवस : १६,१८**

### सिंह

कार्य क्षेत्रात काहीतरी नवीन शिकून त्याची अंमलबजावणी केल्यास तुम्हांला एक सुखद अनुभव मिळेल आणि यशाचा मार्ग मोकळा होईल. तुमच्या मनाचे ऐकून तुमच्या प्रकल्पासाठी निर्णय घेणे तुमच्या हिताचे असेल. तुमच्या जोडीदाराच्या सहवासात तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही समाधानी असाल. कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा या आठवड्यात तुमच्यावर दिसत आहे आणि जीवनात आनंद आणेल. कुटुंबाच्या सहवासात घालवलेला वेळ तुमच्यासाठी खूप आनंददायी असेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या प्रवासात संतुलन राखून पुढे गेल्यास प्रवास यशस्वी होतील आणि चांगले परिणाम देतील. आठवड्याच्या शेवटी आयुष्यात काही बंधने येऊ शकतात आणि तुम्हांला अस्वस्थ वाटेल.

**शुभ दिवस : १४,१६,१८**

### कन्या

या आठवड्यापासून आर्थिक संपत्ती वाढीचे शुभ संयोग घडतील आणि वेळ अनुकूल राहील. तुम्ही तुमच्या गुंतवणुकीबाबत जितके विचारपूर्वक निर्णय घ्याल तितके तुम्ही यशस्वी व्हाल. या आठवड्यापासून तब्येतीत बरीच सुधारणा होईल आणि भागीदारीत केलेले कोणतेही कार्य तुमच्यासाठी चांगले परिणाम देईल. या आठवड्यात प्रवासादरम्यान तुमच्या कागदपत्रांकडे लक्ष द्या, कारण एखादी छोटीशी चूक तुम्हाला महागात पडू शकते. सप्ताहाच्या शेवटी काळ शांतता आणणारा असून मन प्रफुल्लित राहील. वीकेंडमध्ये तुम्ही तुमच्या भविष्यासाठी काही ठोस निर्णयही घेऊ शकता.

**शुभ दिवस : १५,१६,१८**

### तूळ

या आठवड्यापासून आर्थिक लाभासाठी मजबूत परिस्थिती निर्माण होईल आणि गुंतवणुकीतून चांगले संदेश मिळतील. या आठवड्यात तब्येतीतही बरीच सुधारणा होईल आणि तुम्हाला भावनिकदृष्ट्या खूप ऊर्जा आणि निरोगीपणा जाणवेल. कुटुंबातील तरुण व्यक्तीच्या यशाबद्दल मन शांत राहील आणि जीवनात आनंद दार ठोठावेल. कामाच्या ठिकाणी कोणतीही बातमी मिळाल्यावर मन उदास होऊ शकते आणि हे लक्षात घेऊन निर्णय घेतल्यास बरे होईल. या आठवड्यात तुम्ही प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल. सप्ताहाच्या शेवटी जीवनात काही अडथळे येऊ शकतात आणि मन अस्वस्थ होईल.

**शुभ दिवस : १६, १८**

### वृश्चिक

आर्थिक बाबतीत तुम्ही खूप शिथिल असाल आणि धनलाभ होईल. कामाच्या ठिकाणी प्रगती तेव्हाच होईल जेव्हा तुम्ही बॅकअप योजना घेऊन पुढे जाल. तुम्हाला दिलेली आश्वासने या आठवड्यात तुमच्या कामाच्या ठिकाणी पूर्ण होताना दिसत नाहीत. या आठवड्यात केलेल्या प्रवासाचे शुभ संकेत मिळत असून काळ अनुकूल राहील. आठवड्याच्या शेवटी मन एखाद्या गोष्टीबद्दल दुःखी राहू शकते.

**शुभ दिवस : १४,१७,१८**

### धनु

या आठवड्यात तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सहवासात आनंददायी वेळ घालवाल आणि हळूहळू जीवनात काही ठोस बदलही दिसतील. आपल्या बाजूने ते यशस्वी करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिल्यासच प्रवासातून यश मिळेल. आर्थिक बाबींमध्ये प्रवासाशी संबंधित खर्च जास्त असू शकतो. नोकरीच्या ठिकाणी वयोवृद्ध व्यक्तीबद्दल मनात चिंता अधिक राहील. उज्ज्वल व्यक्तिमत्व असलेल्या व्यक्तीमुळे अडचणी उद्भवू शकतात. आठवड्याच्या शेवटी सुधारणा होतील.

**शुभ दिवस : १२,१५,१६**

### मकर

या आठवड्यात तुम्हांला तुमच्या कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा मिळेल आणि तुमच्या प्रियजनांसोबतचे तुमचे परस्पर प्रेमही दृढ होईल. आठवड्याच्या उत्तरार्धात केलेल्या प्रवासामुळे अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात कामाच्या ठिकाणी नुकसान होऊ शकते आणि याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आर्थिक खर्चाची परिस्थितीही या आठवड्यात निर्माण होईल. आठवड्याच्या शेवटी तुम्हांला तुमच्या मेहनतीचे शुभ परिणाम मिळतील.

### कुंभ

या आठवड्यात तुम्ही तुमचे आरोग्य चांगले अनुभवाल आणि कोणतीही नवीन आरोग्य कृती तुमच्यासाठी चांगले परिणाम देईल. तुम्हांला कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा मिळेल आणि तुम्ही आनंदात वेळ घालवाल. या आठवड्यात केलेल्या प्रवासामुळे सामान्य यश मिळेल. कामाच्या ठिकाणी सर्वांचे ऐका आणि तुमच्या मनाचे पालन करा, तरच तुम्हांला शांती मिळेल. आर्थिक खर्च जास्त असेल आणि स्त्रीवर जास्त खर्च होताना दिसत आहे. सप्ताहाच्या शेवटी मात्र वेळ अनुकूल राहील, आदर वाढेल आणि जीवनात सुख-समृद्धीची दारे उघडतील.

### मीन

कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि या आठवड्यापासून तुम्ही तुमच्या कार्यशैलीत खूप बदल घडवून आणू शकाल. आर्थिक बाबींमध्ये हळूहळू सुधारणा होईल, परंतु या आठवड्यात तुम्ही केलेल्या मेहनतीचे भविष्यात सुंदर परिणाम मिळतील. आयुष्यातील नवीन सुरुवात तुमच्यासाठी आनंद आणू शकते. या आठवड्यात प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल. आठवड्याच्या शेवटी, एक नवीन सुरुवात तुमच्या जीवनात आनंद आणि सामंजस्य वाढवेल आणि काही जुन्या आठवणी देखील ताज्या होतील. **शुभ दिवस : १६,१८**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# शहरात राष्ट्रीय दर्जाचे महिला हॉस्पिटल करु

## आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची ग्वाही

✔ सुराज्य/सोलापूर

गुरूनानक चौक येथे दोनशे बेडचे उभारण्यात येत असलेले महिला हॉस्पिटल राष्ट्रीय दर्जाचे करू. या हॉस्पिटलसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी माहिती आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दिली.

शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे शुक्रवारी सोलापूरच्या दौऱ्यावर होते. यावेळी माध्यमांच्या प्रतिनिधींशी ते बोलत होते. यावेळी आरोग्य मंत्री सावंत म्हणाले, यासाठी निधी किती लागेल हे प्रशासन ठरवेल. परंतु यासाठी आवश्यक तो निधी कमी पडू देणार नाही.



जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयाकडून पाठपुरावा केल्यानंतर व मंजुरी नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गुरुनानक चौक येथे एकूण साडेचार एकर जागेत २०० बेडचे जिल्हा रुग्णालय उभारले जात आहे. यामध्ये १०० खाटा या बाल रुग्णालयासाठी व १०० खाटा महिला रूग्णालयासाठी असतील. सध्या हॉस्पिटलचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र उर्वरित बांधकाम व अंतर्गत साहित्य बसवण्याचे काम निधीअभावी रखडले आहे. यासंदर्भात आरोग्य मंत्री सावंत यांना विचारले असता त्यांनी निधी कमी पडू देणार नसून प्रशासनाने मागणी केल्याप्रमाणात निधी देणार असल्याचे जाहिर केले. तसेच या हॉस्पिटलचा दर्जा हा राष्ट्रीय असेल, असेही यावेळी त्यांनी जाहिर केले.

### निधी अन् लॉकडाऊनमुळे रखडले काम

- या हॉस्पिटलच्या बांधकामांची वर्कऑर्डर मार्च २०१९ मध्ये निघाली. २०२१ मध्ये हॉस्पिटलचे काम पूर्ण होणे गरजेचे होते. परंतु लॉकडाऊन आणि अपुरा निधी यामुळे येथील काम बंद होते. जून २०२१ नंतर येथील काम पुन्हा सुरू झाले असून ते अंतिम टप्प्यात आहे. यासाठी जवळपास ७० कोटी रूपये निधी मंजुर आहे. यातील मंजुर निधी प्राप्त होताच या हॉस्पिटलच्या कामाला आणखी गती येणार आहे.

# आव्हाड यांच्या अटकेच्या निषेधार्थ आंदोलन




✔ सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराज यांचा चुकीचा इतिहास दाखविणाऱ्या विरोधात आ. जितेंद्र आव्हाड यांनी चित्रपट बंद पाडला या प्रकरणी आव्हाड यांना सुडापोटी चुकीची अटक करण्यात आली. याच्या निषेर्धात राज्य सरकार विरोधात सोलापूर राष्ट्रवादी कडून रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात आले.

राज्यात हर हर महादेव मराठी चित्रपटाने जनमानसात छत्रपती शिवाजी महाराज यांचा चुकीचा इतिहास दाखवून शिवाजी महाराज यांची नाहक बदनामी करण्याचे षडयंत्र रचले आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादीचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी तेथील पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत ठाणे मधील एका मॉल मध्ये चित्रपटाचे प्रदर्शन थांबविले असता सध्याचे राज्यातील खोकेबाज सरकारने दडपशाही वापरत आव्हाड यांना खोट्या आरोपात अटक केली आहे. अटकेच्या निषेधार्थ शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने चार हुतात्मा पुतळा येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष भारत जाधव यांच्या नेतृत्वात प्रदेश सचिव संतोष पवार, माजी अध्यक्ष महेश गादेकर, प्रदेश सचिव शंकर पाटील, तौफिक शेख व इतर अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते. जय जिजाऊ जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज यांचा चुकीचा इतिहास दाखविणाऱ्या वृत्तींचा निषेध असो, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो आदी घोषणा यावेळी देण्यात आल्या.


या आंदोलनात सुनिता रोटे, विद्या लोलगे, लता ढेरे, लता फुटाणे, शशिकला कसपटे, वंदना भिसे, आफरीन पटेल, सुप्रिया लोमटे, ज्योती षटगार, शशिकला धांकापुरे, युवक शहराध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, सुहास कदम, निशांत सावळे, चंद्रकांत पवार, राजू भाई कुरेशी, दीपक राजगे, अमिर शेख, अनिल बनसोडे, प्रमोद भोसले, आकाश जांभळे, अल्ताफ बुरहान, बंटी यमपुरे, लक्ष्मण भोसले, लखन गावडे, सनी म्हेत्रे, सरफराज शेख, सरफराज बागवान, कुमार जंगडेकर, युण्णुस मुर्शुद, अलमेहराज आबादीराजे, बिरप्पा बंडगर, सोमनाथ शिंदे, संजय कुराडे, बाळासाहेब मोरे, श्रीमंत चव्हाण, दादाराव रोटे, गोवर्धन सुंचु, हेमंत चौधरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## भारत जोडो पदयात्रेसाठी जय मल्हार चौकात नावनोंदणी

✔ सुराज्य/सोलापूर : शहरातील नागरिकांना अकोला येथील भारत जोडो पदयात्रेत सहभागी होता यावे यासाठी नावनोंदणी अभियान सोलापूर उत्तर विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या अभियानाची सुरुवात शहराध्यक्ष प्रकाश वाले, युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, व ब्लॉक चे अध्यक्ष उदय शंकर चाकोते, परिवहन समितीचे तिरुपती परकीपंडला यांच्या प्रमुख उपस्थितीत जय मल्हार चौक येथे घेण्यात आली. यावेळी शहर उत्तर युवक उपाध्यक्ष शिवराज कोरे, अशुतोष वाले, आदित्य म्हमाणे, महेंद्र शिंदे, योगेश सोलापुरे, युवा नेते शंभू पवार, एम. एल प्रतिष्ठानचे प्रमुख गणेश वाघमारे, अभिजीत डोलारे, विजय रणदिवे, राकेश रणदिवे, ओम पवार, अनिल हलकंट्टी, सुभाष वाघमारे, अण्णा लोंढे, समाधान मोरे, रोशन कसबे, बबलू जाधव, समर्थ मोरे, राज गायकवाड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी धोत्रे यांची पुण्याला बदली



✔ सुराज्य/सोलापूर : जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांची नुकतीच पुणे येथे बदली झाली आहे

संतोष धोत्रे मागील दीड वर्षापासून सोलापूर जिल्हा परिषदेवर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्यांनी जिल्हा परिषद मधील इतरही विभागावर प्रभारी म्हणून काम पाहिले होते. त्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा होत होती आता त्यांची पुणे विभागामध्ये माझी वसुंधरा आणि पाणलोट क्षेत्र या ठिकाणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. धोत्रे मूळचे नरखेड येथील आहेत. सोलापूरला येण्याअगोदर त्यांनी सातारा, धुळे, जालना या ठिकाणी प्रशासनात कामे केली होती. सोलापूरला आल्यानंतर त्यांनी घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबवून त्याला मोठी गती आणली होती तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या ठिकाणीही बचत गटाची चळवळ त्यांनी चांगले प्रकारे वाढवली होती.

## जोगेश्वरी यात्रेनिमित्त तांदुळवाडीत विविध कार्यक्रम

✔ सुराज्य/वेळापूर

तांदुळवाडी (तालुका माळशिरस) येथे सालाबाद प्रमाणे यंदाही तांदुळवाडी ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री सिध्दनाथ जोगेश्वरी यात्रा सोहळ्याचे १६ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर२०२२ रोजी तीन दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रा सोहळ्यामध्ये बुधवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री काळ भैरवनाथ जन्मोत्सव निमित्त सकाळी ८ ते ११ हनुमान हायस्कूल लेझीम, माध्यमिक विद्यालय लेझीम, व समस्त ग्रामस्थ लेझीम कार्यक्रम होणार आहे. सकाळी ११ ते ५ भोजलिंग गजी ढोल मंडळ बंडगरवाडी, बिरोबा गजी ढोल शेंडगेवाडी, श्रीनाथ गजी ढोल बोरगाव यांचा गजीढोल कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ७. ३० ते १०. ०० वाजता ह भ प अनिरुध्द महाराज निंबाळकर यांचा किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे व रात्री १०. ०० वाजता पुष्पवृष्टीचा कार्यक्रम व रात्री १०. ०० ते १२. ०० संगीत भजनाचा कार्यक्रम होणार आहे.




गुरुवार दिनांक १७ नोव्हेंबर२०२२ रोजी श्रींची पहाटे ५. ०० वाजता महापूजा होऊन सकाळी ८. ०० ते ४. ००, सनई वादन व सायंकाळी ७. ०० ते १०. ०० ह भ प लक्ष्मण महाराज राजगुरू यांचा भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी ग्रामदैवत श्री सिध्दनाथ जोगेश्वरी दैवताची सकाळी ८. ०० वाजल्यापासून मिरवणूक निघणार आहे. त्याचबरोबर सायंकाळी ७. ०० वाजता वैभव डान्स म्युझिकल नाईट कोल्हापूर यांचा आर्केस्ट्रा मनोरंजनाचा कार्यक्रम होणार आहे.






## मार्कंडेयच्या तज्ज्ञ संचालकपदी डॉ. मुळे, बोल्ली यांची निवड

✔ सुराज्य/सोलापूर : श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात तज्ञ संचालक म्हणून डॉ. भारत मुळे व श्री श्रीधर बोल्ली यांची संचालक मंडळाने एकमताने निवड करण्यात आले. याप्रसंगी त्यांचा सत्कार रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी केला. याप्रसंगी रुग्णालयाचे चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल, व्हा. चेअरमन औनिवास कमटम, संचालक डॉ. माणिक युर्रम, डॉ. सुदिप संभारम, लता मिठ्ठाकोल, लक्ष्मीनारायण कुचन, अशोक आडम, अविनाश बोमडयाल, विनायक कोंडयाल, मनोहर अन्नलदास, पार्वतय्या श्रीराम, इरेशम कोंपेल्ली, रमेश विडप, सुरेश फलमारी, सुधाकर युंडेली, आनंद चंदनशिवे, माधवी चिटयाल तसेच प्रशासकीय अधिकारी श्री स्वामी आकैन, अरुण जोजी, मेडीकल ऑफिसर डॉ. राजशेरवर स्वामी आदी उपस्थित होते.

## फोडून सोन्याचे दागिने पळवले



✔ सुराज्य/सोलापूर

सहकुटुंब गणपतीपुळे जि. रत्नागिरी या ठिकाणी गेले असता, अज्ञात चोरट्याने घराचा मुख्य दरवाजाचे लॉक तोडून घरातील कपाटा मधील ठेवलेली रोख रक्कम, लक्ष्मीहार, गंठण, कानातील टॉप्स, कानातील रिंगा असा एकूण ९६ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. ही घटना दि. १० नोव्हेंबर रोजी दाळगे प्लॉट भवानी पेठ सोलापूर येथे घडली. याप्रकरणी मयूर दिलीप सिध्दनाथ (वय-३२, रा. दाडगे प्लॉट) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार थोरात हे करीत आहेत.

# महिलांची आर्थिक स्वयंपूर्णता होण्यासाठी धाडसाने उद्योग करण्याची गरज : मोहिते

## साक्षरता अभियानात शिकलेल्या उद्योजिकेने केले महिलांना उद्योग साक्षर

✔ सुराज्य/बार्शी

महिलांनी धाडसाने वेगळी वाट निवडत उद्योग केले तर आर्थिक स्वयंपुर्णता मिळते, असे मत जालन्यातील एका महिला उद्योजक सिताबाई मोहिते यांनी व्यक्त केले. येथील उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीने अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त आयोजित केलेल्या ५ दिवसीय भव्य राज्यस्तरीय भगवंत कृषि महोत्सवातील चौथ्या दिवशी आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.

या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी बार्शीचे आमदार राजाभाऊ राऊत यांच्या पत्नी सौ. कविताताई राऊत या होत्या. यावेळी व्यासपिठावर भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष धनश्री खटके, जिल्हाउपाध्यक्ष ॲड. राजश्री तलवाड, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष सौ. पद्मजा काळे, माढ्याच्या भाजपा तालुकाध्यक्ष सौ. प्रतिक्षा गोफणे, भाजपा बार्शी महिला शहराध्यक्ष सौ. रुपाली ढगे, नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या समाजसेवी डॉ. व लेखीका ऐश्वर्या रेवडकर, माजी नगरसेविका मनिषा पोकळे आदी व्यासपिठावर उपस्थित होते. यावेळी मोहिते म्हणाल्या केवळ २०० रूपयांच्या भांडवलावर माझा उद्योग सुरू झाला हे आज सांगताना कोणालाही खरे वाटणार नाही. पण कोणत्याही मोठ्या कार्याची सुरूवात शुन्यापासूनच होते. मला लिहता वाचता



नसले तरी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर १३५ पुरस्कार मिळाले आहेत. जगभरातील विविध देशांमध्ये जाण्याची संधी मिळाली आहे. केवळ स्वत:ला घडवायचे आणि सिध्द करायचे प्रामाणिकपणे ठरवले होते. आपण व्यवसाय करताना जे उत्पादन विकतो ते विकत घेताना ग्राहकाला समाधान वाटले पाहिजे त्याचप्रमाणे तो ग्राहक कायम स्वरूपी टिकला पाहिजे आणि त्यासाठी आपल्या उत्पादनाचा दर्जा कायम राखला पाहिजे माझ्या व्यवसायात हे तत्व कायम जोपासले. त्यामुळे आवळा पासून कँडीचा सुरू केलेला उद्योग आज आवळा प्रक्रिया उद्योगातील १४ उत्पादनापर्यंत विस्तारला आहे.

महिला बचत गटांमध्ये अध्यक्ष आणि सचिवांनी आपल्या गटातील महिलांचे स्वभाव, गुण, कौशल्ये, दोष यांचे निरीक्षण केले पाहिजे व त्यांना त्यांच्या क्षमता, कल यानुसार उद्योगातील जबाबदाऱ्या वाटून दिल्या पाहिजेत. महिला बचत गटांचे जाळे विस्तारण्याची गरज असून या गटांनी सहकार तत्व समजून घेवुन एकमेकांच्या विकासाला पुरक वागले पाहिजे. सद्यस्थितीमध्ये उत्पादने कितीही गुणवत्तापुर्ण असले तरी पणन व विपणन यांचे शास्त्रही माहित असणे गरजेचे आहे. ग्राहकांची मानसिकता ओळखता आली पाहिजे तसेच आपल्या उत्पादनांचे बाजार पेठेतील स्थान व बाजारातील मुल्यांकन यांचेही भान असले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. आपले पती रामभाऊ यांची खंबीर साथ लाभल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राजश्री तलवाड यांनी केले. मंगेश दहिहांडे व अपर्णा दळवी यांनी सूत्रसंचालन केले.





# पालिकेच्या तीन बीओटी प्रकल्पांचा लिलाव तिसऱ्यांदाही झाला फेल

## महापालिकेच्या फेरधोरणाकडे व्यापाऱ्यांचे लक्ष

सुराज्य/सोलापूर

शहरात महापालिकेच्या विविध तीन ठिकाणच्या बीओटी प्रकल्पांचा लिलाव प्रतिसाद अभावी सलग तिसऱ्यांदा फेल गेला आहे. यामुळे मनपा प्रशासनाने आता तरी व्यवहार्य दृष्टिकोनातून फेरधोरण आखण्याची गरज वर्तवली जात आहे.

अनेक वर्षांपासून आर्थिक संकटात असलेल्या महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी नवनवीन स्रोत निर्माण करण्यासाठी महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी महत्त्वाकांक्षी तीन बीओटी प्रकल्प सोलापूर शहरात उभारण्यासाठी नियोजन केले आहे. मनपात सध्या प्रशासकराज आहे. त्यामुळे राजकिय हस्तक्षेपाला वाव नाही. गत सात महिन्यांपासून प्रशासकीय उपसमितीच्या माध्यमातून मनपाचा कारभार सुरू आहे. अनेक चांगले निर्णय घेतले जात आहे. कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्नही होत आहेत, मात्र मनपाच्या नवीन बीओटी प्रकल्पांबाबतचे धोरण अव्यवहार्य असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, मनपाच्या मालकीच्या साखर पेठ, बेगम पेठ, पाच्छा पेठ अशा तीन ठिकाणी व्यापारी संकुलांचे बीओटी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. भाडे तसेच विनापरताव्याची रक्कम या पध्दतीवर या गाळ्यांचा लिलाव करण्याचा मनपाकडून झाला. पहिल्या वेळी प्रतिसाद न लाभल्याने प्रकल्पांत सुधारणा करून फेरलिलाव करण्यात आला. तरीदेखील प्रतिसाद मिळाला नाही. यानंतर नुकतेच पुन्हा काही सुधारणा करून तिसऱ्यांदा लिलाव पुकारण्यात आला, मात्र त्यासही प्रतिसाद मिळाला नाही. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यापूर्वी मनपा प्रशासनाने व्यापाऱ्यांना विश्वासात घेणे गरजेचे होते, मात्र तसे झाले नाही. पहिल्या वेळी लिलाव फेल गेल्यावर व्यापाऱ्यांनी हे तीनही प्रकल्प अव्यवहार्य असल्याचे म्हटले होते.

### व्यापाऱ्यांशी चर्चा करून नवीन धोरण

भाडे दर, विनापरताव्याची रक्कम ही अवाजवी असल्याचे त्यांचे म्हणणे होते. याची दखल घेत काही सुधारणा मनपाने केल्या तरीदेखील दुसऱ्या व तिसरा लिलावही फेल गेला आहे. हे प्रकल्प उभारण्यात महापालिकेने अजूनही अव्यवहार्यच धोरण अंगीकारले आहे असे दिसून येते. एकंदर सलग तीन वेळा लिलाव फेल गेल्याने मनपा प्रशासनाला या प्रकल्पांबाबत फेरविचार करण्याची वेळ आली आहे. लिलाव भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांशी चर्चा करून नवीन धोरण आखल्यास हे प्रकल्प यशस्वी होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### व्यवहार्य दृष्टिकोन ठेवण्याची गरज

आजवर महापालिका सभेत केवळ चर्चा, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापलीकडे काहीच झाले नाही, मनपाच्या शहरात अनेक ठिकाणी कोट्यवधींच्या मालमत्ता धूळ खात पडून आहे. ज्या जागा, समाजमंदिर आदी मालमत्ता भाडेतत्त्वावर दिल्या खऱ्या; पण त्या नाममात्र दराने अर्थात खिरापतीप्रमाणे दिल्या गेल्या. लोकप्रतिनिधींनी या जागा लाटल्या असून त्यांना या मालमत्तांपासून मोठा फायदा तर मनपाचा चुना असा विसंगत प्रकार दिसून येतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या तीनही बीओटी प्रकल्प गाळे लिलाव प्रक्रिया व्यवहार्य दृष्टिकोन ठेवून करावी तरच त्याला व्यापाऱ्यांचा प्रतिसाद मिळेल.



## किल्ला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

सुराज्य/वेळापूर : मळोली येथील रणजितसिंह बापू मित्रमंडळ यांच्यावतीने दिवाळी सणानिमित् घेण्यात आलेल्या किल्ला स्पर्धेचा बक्षीस वितरण जनता विद्यालय व जुनियर कॉलेज मळोली येथे पं. स. सदस्य रणजितसिंह जाधव व जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. आर. जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रथम क्रमांक विभागून अंजली अंकूश मोरे, वेद मिलींद जाधव. व्दितीय क्रमांक विभागून शुभम महेंद्र देशपांडे, विजय सुरेश जाधव. तिसरा क्रमांक विभागून ओंकार शिवाजी गेजगे, तनुजा तानाजी जाधव. उत्तेजनार्थ विभागून शिवम प्रमोद क्षिरसागर, संग्राम सोमनाथ जाधव यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी दादा जाधव, प्रभाकर इंगळे सर देशमुख, स्पर्धा आयोजक राजाभाऊ जाधव, ग्रामपंचायत सदस्य मुजावर, मिलिंद जाधव, उमेश जाधव, दिलीप जाधव, संजय गुजर, शिवाजी जाधव, प्रमोद क्षिरसागर, पर्यवेक्षक तानाजी लवटे यांच्यासह शिक्षक वर्ग विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. सूत्रसंचालन पृथ्वीराज जाधव यांनी केले तर आभार राजाभाऊ जाधव यांनी मानले.



## संध्या चिवरे यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर : वडजी (ता. दक्षिण सोलापूर) येथील आनंदराव देवकते माध्य व उच्च माध्य प्रशालेतील प्राध्यापिका संध्या चिवरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय अल्पसंख्यांक शिक्षक व शिक्षकेतर संघटनेच्या वतीने आदर्श व गुणवंत शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार हा पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे देण्यात आला. चिवरे यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. पुरस्कार प्राप्त झाल्याने प्रशालेचे मार्गदर्शक विश्वास गजबार व शाळा समितीचे अध्यक्ष विठ्ठल हक्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आनंदराव देवकते माध्य व उच्च माध्य प्रशालेच्यावतीनेही चिवरे यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार, शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के, सुरेंद्र कांबळे आनंद भिमन्वरू, सचिन क्षीरसागर, अश्विनी निचळ, लक्ष्मण चिवरे, सोहेब मुजावर, मनीषा क्षिरसागर आदी उपस्थित होते.

## साळमुखवाडी येथे ठाकरे यांचे स्वागत

सुराज्य/पिलीव : युवा सेना प्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी पर्यावरण मंत्री आ आदित्य ठाकरे यांचे साळमुखवाडी येथील चौकातून शिवसेनेकडून स्वागत करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अशोक घोंगडे, माळशिरस तालुका प्रमुख नामदेव वाघमारे, श्याम मदने, प्रा शंकर शिंदे, दादासाहेब मदने, सुभाष काकडे, योगेश देशमुख, समर्थ जामदार, शयामदादा लेंगरे, महावीर धायगुडे, संभाजी लोखंडे, सवस्तान शिंदे, गणेश देशमुख, संजय पाटील, तुषार राऊत, यांच्या सह पिलीव परीसरातील शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

## महादेव कोडग यांचे निधन



सुराज्य/श्रीपूर : माळखांबी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व भारतीय जनता पार्टी माळशिरस तालुका माजी अध्यक्ष आणि जनक्रांती संघटनेचे खंदे सर्मथक महादेव धर्मराज कोडग (वय ५५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पक्षात पत्नी, दोन मुले, सून, नातू असा परिवार आहे.

# भंडाराकवठेत ग्रामपंचायत विरोधात आंदोलन

### सत्ताधारी-विरोधक गाळ्यांसाठी एकत्र

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभाराविरोधात भंडारकवठे येथील कार्यकर्ते राजकुमार बिराजदार यांनी भंडारकवठे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले आहे.

भंडारकवठे ते बाळगी रस्त्यालगत असलेल्या अर्धा एकरपेक्षा जास्त जमीन पडीक असून त्या जागेवर भंडारकवठे येथील ग्रामपंचायत सत्ताधारी व विरोधक स्वत:च्या स्वार्थासाठी एकत्र येऊन सर्व १७ सदस्यांनी सरकारी गावठाण जमिनीत गाळे बांधण्यास मासिक बैठकीत मंजुरी दिली आहे.




> हे भूखंड जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित येत असून ग्रामपंचायतीच्या सतरा सदस्यांनी मासिक बैठकीत परस्पर ठराव करून तो घेतला आहे. तसेच सध्या गावात एक्केचाळीस गाळे असून त्यापैकी अकरा गाळे हे बंद अवस्थेत आहेत. अनेक गाळेधारकांनी गेल्या दहा वर्षांपासून ग्रामपंचायतीचे भाडे भरले नाही. त्यांना नोटिसा देऊन सदर गाळे ग्रामपंचायतने ताब्यात घेऊन गरजू व्यावसायिकांना द्यावे. या संदर्भात मी दक्षिण सोलापूर गट विकास अधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे माहिती देणार आहे, असे राजकुमार बिराजदार यांनी सांगितले.

सतरा सदस्यांना गाळे हे आपल्या जवळील पाहुणे व नातेवाईक यांना परस्पर सरकारी जागा देण्यात आले. असे अनेक प्रकार यापूर्वी घडले आहेत. भूखंडावर कुठलीही शासकिय नोंद नाही तसेच भूमापन क्रमांक सुध्दा नाही सदरची जागा ही जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित येत असून जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेताच परस्पर मासिक बैठकीत ठराव करुन ग्रामपंचायत गाळे बांधत आहेत. या ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभाराविरोधात बिराजदार यांनी भंडारकवठे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले आहे.

# माहूरची आईची यात्रा उत्साहात संपन्न

सुराज्य/सोलापूर : नान्नज ग्रामस्थांचे ग्रामदैवत माहूरची आईची यात्रा भक्तिमय व आनंदाने संपन्न झाली. देवीच्या यात्रेला नान्नसह, सोलापूर, वडाळा, मार्डी, नरोटेवाडी, वडगाव, कारंबा, सेवालाल नगर व इतर गावच्या भाविकांनी दर्शन घेतले.



शंभर वर्षांची परंपरा असलेल्या देवीच्या यात्रेत पहिल्यांदाच करमणुकीच्या कार्यक्रमातून तमाशाला वगळण्यात आले. खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. गावातला पैसा गावाच्या विकासासाठी वापरला पाहिजे. भक्त गणांना चांगल्या सुविधा देण्यासाठी पक्का रस्ता, वीज पाणी असी सोय करण्यात यावी असी मागणी ग्रामस्थांनी केली. ग्रामविकास अधिकारी गंगाधर कांबळे यांचे नियोजन, स्थानिक सरपंच व सद्स्य यांचे सहकार्य, उत्तर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्यामुळे यात्रा व्यवस्थित पार पडली. यावेळी सरपंच राणी टोणपे, उपसरपंच ज्योती दडे, पोलीस शारदा घोळवे, ए एस चव्हाण पोलीस, ग्रामपंचायत सदस्यांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## ट्रकची दुचाकीला धडक; एकजण जखमी

सुराज्य/सोलापूर : कपडे खरेदी करण्यासाठी येत असताना एका ट्रक चालकाने दुचाकीला धडक देऊन दुचाकीवरील तरुणाला जखमी केल्याची घटना दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास ठोकळ नगर बाळे येथे घडली. याप्रकरणी योगेश माणिक जानराव (वय २८, रा. मु. पो. नान्नज) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.




फिर्यादी हे त्यांची दुचाकी क्र. एम. एच. १३. सीए. ८५४९ यावरून कपडे खरेदी करण्यासाठी वरील ठिकाणी आले असता. त्यावेळी भरधाव वेगात येणाऱ्या ट्रक क्रमांक एम. एच. १३. ए. एक्स. ४४६४ यामधील चालकाने योगेश जानराव यांच्या दुचाकीला धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.



# हंसराज अहिर यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा भाजप ओबीसी आघाडीचे राष्ट्रीय सरचिटणीस हंसराज अहीर हे तुळजापूर येथे दर्शन घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांचे अक्षय अंजिखाने मित्र परिवाराच्या वतीने केला स्वागत करण्यात आले.

देवस्थानच्या वतीने हंसराज अहिर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तुळजापूर, धाराशिव, सोलापुरातील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुणे दादासाहेब सातव, सोलापूरचे संजय साळुंखे, संदीप जाधव, युवा मोर्चा सोलापूर संघटन सरचिटणीस सागर अतनुरे, सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य यतीराज होनमाने, बसवेश्वर सर्कलचे गुरुराज पदमगोंडा, आदी उपस्थित होते.

## उस्मानाबादमध्ये २० पासून
## पुरुष व महिला गट खो-खो स्पर्धा

सुराज्य/सोलापूर : पुरुष व महिला गटाची ५५वी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धा उस्मानाबाद येथे २० ते २४ नोव्हेंबर दरम्यान होत असल्याची माहिती भारतीय खो खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजीत जाधव यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. उस्मानाबाद जिल्हा खोखो असोसिएशनने ही स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा उस्मानाबाद येथील तुळजाभवानी जिल्हा क्रिडा संकुलात होत आहे. या स्पर्धेसाठी पाच मैदाने तयार करण्यात येत असून तीन मातीची व दोन मॅटची असणार आहेत. चार मैदानावर विद्युतझोताची सोय करण्यात आली असून इनडोअर हॉलमधील एका मैदानावरही हे सामने प्रकाशझोतात होतील. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व माजी खो-खो खेळाडूंचा सोलापुरी चादर व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष महेश गादेकर, उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशनचे अध्यक्ष अनिल खोचरे, आयोजन समितीचे सदस्य रेहमान काझी आदी उपस्थित होते.

## दीराकडून पैशाची मागणी; विवाहिता पोलीस ठाण्यात

सुराज्य/सोलापूर

दिराने कार घेण्यासाठी माहेरहून पैसे आन असे म्हणत पैशाची मागणी केली. तसेच पती व सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून बँकेत जॉईंट अकाउंट काढण्याच्या कारणावरून विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह सहा जणांविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १९ मार्च २०२० ते २८ सप्टेंबर २०२० दरम्यान घडली. याप्रकरणी अनुसया पटेल (वय-३२, रा. सिटीझन पार्क नवीन आरटीओ ऑफिस जवळ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती हार्दिककुमार मनुभाई पटेल, सासरे मनुभाई पटेल, सासू ज्युतीका पटेल, दिर सविन पटेल, (सर्व रा. बहुचारपुरा, राज्य-गुजरात), ननंद निकिता गर्जेंद्रसिंह विहोल, नदवा गर्जेंद्रसिंह विहोल (रा. शाम विहार, राज्य गुजरात) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# माळशिरस तालुक्यातील नूतन वकिलांना दिली सनद

सुराज्य/वेळापूर

माळशिरस तालुक्यातील वेळापूर गावचे नुतून ॲड. अनिकेत दत्तात्रय आडत, अकलूज येथील ॲड. तन्वीर शब्बीर जमादार, दहिगाव येथील ॲड. सोनाली तुकाराम विलकर यांना माळशिरस न्यायालय येथील माळशिरस वकील संघटनेच्या बार रूम ध्ये महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे यांच्या हस्ते सनद देण्यात आली.

ॲड. आडत यांनी भारतातील अग्रक्रम असलेल्या इंडियन लॉ सोसायटी म्हणजेच आयएलएस लॉ कॉलेज मधून आपले एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले आहे. माळशिरस येथे महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल चे अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे आले असता त्यांनी माळशिरस वकील संघटनेला सदिच्छा भेट दिली. यावेळी वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. बी. आर. पाटील, उपाध्यक्ष ॲड. अमर काळे, सचिव ॲड. नारनवर, सहसचिव ॲड कचरे, खजिनदार ॲड एम टी वाघमोडे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.



त्यानंतर तालुक्यातील नूतन वकिलांना अध्यक्ष ॲड. थोबडे यांच्या हस्ते सनद प्रदान कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ॲड. थोबडे यांनी नुतून वकिलांना सनद देऊन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी माजी अध्यक्ष ॲड. विशाल पाटील, महादेव पवार, नरुटे, जमादार, जी. पी. कदम, एस यु तरंगे, शहाजी ठवरे, जहागीरदार, एन पी शिंदे, रणधीर पाटील, एन एस पिसे, विधी अधिकारी दत्तात्रय आडत, निशांत लोंढे आदी वकील मंडळी उपस्थित होते.

## सल्लागार समितीवर डॉ. देशमुख यांची निवड



सुराज्य/अकलूज : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू यांचे आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्र पुणे अंतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हा निहाय एका तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. यामध्ये डॉ. आबासाहेब देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ते सोलापूरविद्यापीठ प्राचार्य फोरमचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएचडी संपादन केलेली असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

# एकलासपूर येथे ट्रॅक्टरच्या धडकेने वृद्ध महिला ठार

सुराज्य/सोलापूर

एकलासपूर (ता.पंढरपूर) येथे ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या धडकेने ८५ वर्षीय पादचारी महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली. हा अपघात गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडला. या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी अपघाता नंतर ट्रॅक्टरसह फरार झालेल्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चंपाबाई गणपत ताड (वय ८५ रा. एकलासपूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.त्या गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास एकलासपूर येथील मंगळवेढा रोडवर असलेल्या विराट हॉटेल समोरचा रस्ता व ओलांडत होत्या. त्यावेळी एमएच१३-डीएम-३४०८ हा ट्रॅक्टर धडकल्याने त्या गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावल्या. अपघातानंतर ट्रॅक्टर चालक पसार झाला होता. या अपघाताची नोंद पंढरपूर तालुका पोलिसात झाली. पोलिसांनी ट्रॅक्टर चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .




## सावळेश्वर येथे सत्तुरने मारहाण

सोलापूर-आपल्या पत्नीस शिवीगाळ केल्याच्या जाब विचारण्यास गेले असता सत्तुर आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत एक जण जखमी झाला. ही घटना सावळेश्वर (ता.मोहोळ) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. रविशंकर लक्ष्मण काकडे (वय ३८ रा. सावळेश्वर) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळच्या पोलिसांनी संभाजी विष्णू सोनटक्के आणि त्याची पत्नी उषा सोनटक्के या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल सकाळच्या सुमारास काकडे हे सावळेश्वर गावातील ओढ्याजवण जवळ सोनटक्के दांपत्याना आपल्या पत्नीला शिविगाळ का केली? हे विचारण्यात गेले होते. त्यावेळी संभाजी याने सत्तुरने त्यांच्या हातावर वार केला तर त्याच्या पत्नीने लाथाबुक्क्याने मारहाण केली.अशी नोंद पोलिसात झाली आहे.

# कुसमोडच्या शेतकऱ्यांचे उताऱ्यासाठी अकलूजला हेलपाटे

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड गावातील १८०० खातेदार आहेत तर साळमुखवाडी येथील २०० च्या आसपास सभासद आहेत तर कुसमोड, साळमुखवाडी गावासाठी साळमुखवाडी हा सजा आहे. याठिकाणी तलाठी कधी येतात व जातात हे खातेदारांना अजिबात माहीत होत नाही. त्यामुळे उताऱ्यासाठी येथील शेतकऱ्यांना अकलूजला हेलपाटे मारावे लागत आहेत.

या गावासाठी मंडलाधिकारी कार्यालय वेळापूर याठिकाणी आहे. जे अतिशय गैरसोयीची आहे. या दोन्ही गावातील लोकांची मुख्य बाजारपेठ पिलीव आहे. पण लोकांची मोठी गैरसोय केली आहे. याअगोदर ऑनलाईन सातबारा उतारा होता, त्यावेळेस फारशी गैरसोय होत नव्हती. पण, सध्या सातबारा उतारा नंबर तलाठ्याकडून घेतल्याशिवाय सातबारा उतारा निघतच नाही. उताऱ्यासाठी फोन केला की, तुम्ही अकलूजला या म्हणून तलाठी सांगतात. केवळ उताऱ्यासाठी २० ते २५ किलोमीटर अंतर शेतकऱ्यांना जावे लागते. तेच उताऱ्याचे टोकन पिलीव येथील सेतू ठेवण्याची मागणी ग्रामपंचायतींच्यावतीने करण्यात आली आहे. याविषयी वेळापूरचे मंडलाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, असे सरपंच तुषार लवटे यांनी सांगितले.

# अक्कलकोट तालुक्यात लंपी आजाराचा शिरकाव

## दोन दिवसात तीन बळी; पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण

✔ सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुक्यात लंपी आजाराचा शिरकाव होऊन हा आजार हळूहळू उग्र रुप धारण करत असल्याने शेतकऱ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या तालुक्यात दोन दिवसात हंजगी, तडवळ व हंद्राळ गावातून तीन जनावरांचा मृत्यू झाला आहे.**

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील गुरुबसप्पा हालोळे यांच्या शेतातील बैलाला लंपी आजाराचा प्रादुर्भाव झाल्याने एका बैलाचा मृत्यू झाला आहे. गावात गेल्या अनेक दिवसांपासून जनावरांना लंपी आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याची चर्चा सुरू होती. शेवटी आज एका बैलाचा मृत्यू झाल्याने गावातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या तालुक्यात अनेक गावात जनावरांना लंपी आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे चर्चा सुरू आहे. सध्या जेऊर गटात ६० ते ७० जनावरे लंपी आजाराने ग्रासले गेले आहेत. जनावरांच्या आजारावर उपचार करून ही प्रतिसाद मात्र मिळत नसल्याने पशुवैद्यकिय अधिकारी ही हतबल झाले आहेत. ऐन रब्बी हंगामात गाय, म्हैस व बैलांचा या लंपी आजारामुळे मृत्यू होत असल्याने शेतकरी कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळताना दिसून येत आहे. हंजगी येथील गुरुबसप्पा हालोळे यांचा एक बैल लंपी आजाराने मृत्यू झाल्याने सध्या हालोळे कुटुंबीयांना रब्बी हंगामात पेरणी कशी करायची? हा मोठा प्रश्न येऊन ठेपला आहे.

संबंधित हंजगी गावचे सरपंच भाग्यश्री हालोळे, जेऊर पशुवैद्यकिय अधिकारी उटगे, पोलीस पाटील मोहन वाघमोडे आदींनी गुरुबसप्पा हालोळे यांच्या शेतात जाऊन मृत बैलाचा पंचनामा करून अहवाल तयार करून वरिष्ठांना पाठविण्यात आला आहे.

### जनावरांना विलगीकरणात ठेवणे गरजेचे : मुरूमकर

सध्या तालुक्यात लंपी आजाराचा प्रादुर्भावात वाढ होत आहे. खास करून जेऊर मंडळात तीन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लस झाल्यानंतर अठ्ठावीस दिवसानंतर जनावरात प्रतिकारशक्ती निर्माण होत आहे. परंतु हा आजार संसर्गजन्य असल्याने आजारग्रस्त जनावरांना विलगीकरणात ठेवणे गरजेचे आहे, असे तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दिनेश मुरुमकर यांनी सांगितले.

गुरूबसप्पा हालोळे यांच्या बैलाला अनेक वेळा उपचार करून देखील बैलाचा आजार बरा न झाल्याने शेवटी या बैलाचा मृत्यू झाला आहे. भर रब्बी हंगामात बैलाचा मृत्यू झाल्याने गुरुबसप्पा हालोळे यांच्या



कुटुंबीयावर आर्थिक संकट कोसळले आहे. आता तालुक्यात गावा-गावात लंपी आजाराचा शिरकाव होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. लंपी हा आजार पशूमध्ये होणारा प्रमुख संसर्गजन्य रोग असल्याने पशुपालक शेतकरी बांधवांत ही चिंता वाढली आहे. आजपर्यंत या आजारावर कोणताही ठोस उपचार नसल्यामुळे, केवळ लस या आजारावर नियंत्रण आणि प्रतिबंध करू शकत असल्याचे बोलले जात आहे. सध्या जेऊर गटात दिवसेंदिवस लंपी आजाराचा प्रादुर्भावात वाढ होत आहे.

गेल्या तीन दिवसात जेऊर गावात ३ जनावरांचा मृत्यू झाला आहे, तर ६० ते ७० जनावरांना लंपीचा प्रादुर्भाव झाला आहे, असे जेऊर पशुवैद्यकीय अधिकारी अधिकारी उटगे यांनी सांगितले.

## मुस्लीम दफनभूमीच्या बांधकामासाठी १० लाखांचा निधी

✔ सुराज्य/माळीनगर

येथील मुस्लीम समाजाच्या दफनभूमी सरंक्षक भिंतीच्या बांधकामासाठी दहा लाखांचा निधी उपलब्ध झाला आहे, अशी माहिती सरपंच अभिमान जगताप यांनी दिली.

समाजाच्यावतीने तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे दफनभूमीच्या वॉलकंपाऊंडच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन माजी पालकमंत्री भरणे यांनी सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार, त्यांच्या मागणीची दखल घेऊन, सार्वजनिक बांधकाम विभाग अकलूज यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. दफनभूमीच्या कामासाठी निधी मंजूर केल्याने माळीनगर मुस्लिम समाजाच्यावतीने दत्तात्रय भरणे व ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक राजेंद्र गिरमे यांचे आभार मानण्यात आले

## वटवृक्ष मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमा भक्तीभावात साजरी

✔ सुराज्य/सोलापूर

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात सालाबादाप्रमाणे त्रिपुरारी पौर्णिमा मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरी झाली. त्रिपुरारी पौर्णिमेस श्री वटवृक्ष मंदिरात अनन्यसाधारण असे महत्व आहे. या पौर्णिमेस राज्याच्या काना कोपऱ्यातून आलेल्या हजारो स्वामी भक्तांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. पौर्णिमेनिमित्त पहाटे ५ वाजता पुरोहित मंदार व मोहनराव पुजारी यांच्या हस्ते चेअरमन महेश इंगळे यांच्या उपस्थितीत स्वामींची काकड आरती संपन्न झाली. तद्नंतर स्वामी भक्तांच्या दर्शनाकरिता मंदिर



खुले करण्यात आले. स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्याकरिता नित्यनियमाने होणारे अभिषेक बंद ठेवण्यात आले होते. सकाळी साडे आकरा वाजता देवस्थानच्यावतीने श्रींना महानैवेद्य दाखविण्यात आले.

सर्व भाविकांची महाप्रसादाची सोय वटवृक्ष देवस्थानच्यावतीने करण्यात आली होती. सर्व स्वामीभक्तांचे दर्शन सुलभतेने होऊन कोणतेही अनुचित प्रकार घडू नये याकरिता समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख नियोजन करण्यात आले होते. वृद्ध व विकलांग भाविकांना स्वतंत्र व्हीलचेअरवरून दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी ७ वाजता कार्तिक दिवा लावून हजारो दिव्यांच्या दीपप्रज्वलनाने दीपोत्सव साजरा करून त्रिपुरारी पौर्णिमेची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वला सरदेशमुख, दयानंद हिरेमठ, प्रा. शिवशरण अचलेर, गिरीश पवार, सागर गोंडाळ, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, महादेव तेली, अविनाश क्षीरसागर, मनोज जाधव, महेश मस्के व देवस्थानचे कर्मचारी, सेवेकरी उपस्थित होते.



## लोकमंगलच्या किल्ले बांधणी स्पर्धेत ज्ञानप्रबोधिनीची बाजी

✔ सुराज्य/सोलापूर : 'छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी बांधलेले किल्ले हा भारताचा सांस्कृतिक ठेवा असून त्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा', असे आवाहन इतिहास अभ्यासक अनुराग वैद्य (पुणे) यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारक आणि लोकमंगल फाउंडेशन यांच्यातर्फे आयोजित केलेल्या किल्ले बांधणी स्पर्धेचे पारितोषिक वितरण शुक्रवारी शिवस्मारक सभागृहात झाले.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, इतिहास अभ्यासक अनुराग वैद्य (पुणे), अमोघ वैद्य (पुणे), शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारक आणि लोकमंगल फाउंडेशन यांच्यातर्फे आयोजित किल्ले बांधणी स्पर्धेत ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेने (किल्ले जंजिरा) बाजी मारत शालेय गटात प्रथम क्रमांक पटकावला. कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक शाळेने (किल्ले कोरीगड) द्वितीय तर हरीभाई देवकरण प्रशालेने (किल्ले शिवनेरी) तृतीय पारितोषिक मिळवले.

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास निधी द्या : पटेल

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

**अल्पसंख्याक समाजाच्या उन्नतीसाठी मौलाना आझाद महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. निधीअभावी सध्या महामंडळाच्या माध्यमातून शैक्षणिक कर्ज वगळता स्वयंरोजगाराच्या सर्व योजना बंद असून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जिल्हा सचिव जावेद पटेल, उत्तर तालुका प्रमुख सुधीर गोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे केली आहे.**

मौलाना आझाद महामंडळात निधी उपलब्ध नसल्याने मुदत



कर्ज, महिला बचतगट योजना, थेट कर्ज योजना बंद आहेत. त्यामुळे अल्पसंख्याक समाजातील युवकांना छोट्या-मोठ्या व्यवसायासाठी कर्ज मिळत नसल्याने ते बेरोजगार आहेत, आर्थिक विकास महामंडळाप्रमाणे मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास ५०० कोटी निधी उपलब्ध करून द्यावा.

महामंडळामार्फत महिला व युवकांसाठी पूर्वीप्रमाणे प्रशिक्षण योजना सुरू करण्यात यावेत. महामंडळाचे कामकाज सक्षम व सुरळीत होण्यासाठी महामंडळाचे संचालक मंडळ नियुक्त करण्यात यावेत, कर्मचारी व अधिकारी यांचे रिक्त पदे भरण्यात यावीत. अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मिळवून निधी व विविध मागण्या निवेदनाद्वारे केली असून यावेळी उमाकांत गरड, शैलेश चवरे, विजय साठे उपस्थित होते.

## महापालिका चतुर्थश्रेणी नोकरांच्या पतसंस्थेची निवडणूक जाहीर करण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका चतुर्थ श्रेणी नोकरांची सहकारी पतसंस्था सोलापूर या संस्थेचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे सोलापूर शहर उपनिबंधक यांच्याकडे करण्यात आली आहे. शहर उपनिबंधक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर महापालिका चतुर्थश्रेणी नोकरांची सहकारी पतसंस्था सोलापूर ही उपनिबंधक कार्यालयाकडे नोंदणीकृत आहे.

या पतसंस्थेची पंचवार्षिक संचालक मंडळाची मुदत एप्रिल २०२० मध्ये संपलेली आहे. या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक न झाल्याने संस्थेच्या सभासदांना वेळेवर कर्जपुरवठा होत नाही तसेच सेवानिवृत्त सेवकांचे राजीनामे मंजूर होत नसल्याने अनेक सभासदांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

सोलापूर शहरात इतर मुदत संपलेल्या पतसंस्थेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येत आहेत. मात्र, अद्यापही महापालिका चतुर्थश्रेणी नोकरांची पतसंस्था या संस्थेची निवडणुकिसंदर्भात कोणतीही प्रक्रिया सुरू नाही. तेव्हा या पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर व्यंकटेश देवनल्लू, दशरथ अडाकूल, भालचंद्र साखरे, श्रीनिवास रामगल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी नवनाथ कदम

✔ सुराज्य/सोलापूर : श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या असून संघाच्या अध्यक्षपदी नवनाथ कदम यांची एकमताने निवड झाली आहे.

सोमवारी युवाशक्ती चौकात आनंदराव कानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली बैठक पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये नवीन पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आल्या. ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष म्हणून नवनाथ कदम, उपाध्यक्ष आनंदराव कानडे, कार्याध्यक्ष विलासराव देशमुख, सचिव सुभाष चव्हाण, सहसचिव अंबादास चाबुकस्वार, खजिनदार केशव वराडे, प्रसिध्दी प्रमुख शेखर देशमुख, सांस्कृतिक प्रमुख नागेश कुंभार तर सल्लागार म्हणून शरणप्पा देसाई, चन्नप्पा लोणी, चंद्रकांत सावंत यांची निवड झाली. सूत्रसंचालन सुभाष चव्हाण यांनी केले तर आभार नागेश कुंभार यांनी मानले.

## अपार्टमेंटसमोर पार्क केलेली दुचाकी लंपास

✔ सुराज्य/सोलापूर : अज्ञात चोरट्याने हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम. एच.१३. सीएम. ७०२५ ही अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेली आहे. ही घटना दि. ४ ऑक्टोबर रोजी ऐपेक्स कन्स्ट्रक्शन पनाश अपार्टमेंट समोर घडली. याप्रकरणी संतोष विठ्ठल पनगंटी (वय-३९, रा. जुना विडी घरकुल, हैदराबाद रोड) यांनी विजापूर नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक पाटील हे करीत आहेत.




## सय्यद शाह ताहेर दस्तगीर पीर दर्गा यांचा उरुस उत्साहात

✔ सुराज्य/सोलापूर

येथील प्रसिध्द संत (वली) हजरत सय्यद शाह ताहेर दस्तगीर पीर दर्गा यांचा उरुस उत्सव यंदा रविवार, ६ ते ८ नोव्हेंबर २०२२ दरम्यान मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला.

रविवार ६ रोजी रात्री ८ वा. संदलची लवाजम्यासह मिरवणूक लवाजम्यासह धर्मगुरु सज्जादानशीन, सोल ट्रस्टी सज्जादानशीन स. सिराजपाशा उर्फ नवाबपाशा स. मुस्तफा कादरी पीरजादे यांच्या निवासस्थानातून निघून शहरातील मुख्य बाजारापेठेतून दर्गेत पोहोचली व दर्गेत सज्जादानशीन साहेब यांचे हस्ते गंधार्पण (संदल) अर्पण करण्यात आले व सद्भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आले.

सोमवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी चिरागनिमित्त दर्गावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंगळवार, दि. ८ रोजी सकाळी १० वा. दर्गेत कुराण पठण होऊन जियारत संपन्न झाले व भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आले.

उरुसानिमित्त अक्कलकोट शहर, तालुक्यासह परगावचे असंख्य हिंदू-मुस्लीम भक्तांनी महाप्रसाद व दर्शनाचा लाभ घेतला.


## अकलूज येथे शिवप्रताप दिन साजरा

✔ सुराज्य/अकलूज

शिवरायांनी अफजलखानाचा वध केला. शिवरायांवरती चाल करून आलेला बडा सय्यद याला अंगरक्षक जिवाजी महाले यांनी यमसदनी धाडले या धाडस व पराक्रमाची आठवण म्हणून अकलूज येथे शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, अकलूजनगर पंचायतीचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, शिवक्रांती संघटनेचे संस्थापक दत्ताजी काळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वक्ते सचिन शिंदे यांचे 'अफजलखानाचा वध' या विषयावरती व्याख्यान संपन्न झाले.

शिवप्रतापदिनाच्या निमित्ताने भारतीय लष्करात भरती झालेले स्वप्निल फुले, अभय



निकम, रोहन आवताडे, स्वप्निल यादव, विनायक नाईकनवरे, श्रीकांत भोसले, प्रशांत मिस्कर, प्रशांत देवकर या आठ जवानांसह अकलूज ते केदारनाथ सायकल यात्रा करणारे राहुल माने-देशमुख, चाकोरे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी निवड झालेले नवनाथ जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी उद्योजक सचिन डांगे, हटकर महासंघाचे अध्यक्ष भीमराव भुसनर, पत्रकार गणेश जाधव, छावा संघटनेचे तात्यासो. जगताप, दत्तात्रय गोरे, किशोर गाडे इ. सह अनेक शिवप्रेमी-शिवभक्त उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण भांगे, रोहित सुर्यवंशी, शिवाजीभाऊ घोडके, दीपराज देशमुख, हर्षवर्धन भूतनाळ, सागर म्हेत्रे, राहुल माने, निखिल गाडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुधीर पवार यांनी केले.

सुराज्य सोलापूर

Classified

विवाह विषयक

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील. श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.

संपर्क : 9373749140, 7387058736
(121122)

# ऊसतोड कामगारांना आता १० लाखांचे 'विमाकवच'

## कुटुंबीयांना मिळणार संरक्षण; गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचा निर्णय

✔ सुराज्य/सोलापूर

साखर कारखान्यावर दिवसरात्र मेहनत करून साखर उत्पादन करण्यास महत्त्वाची मदत करणाऱ्या ऊसतोडणी करणाऱ्या आणि त्यांच्या कुटुंबियांना आता कायमस्वरूपी दहा लाखाचे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे या ऊसतोडणी कामगारांना अपघाती, नैसर्गिक अथवा इतर कोणत्याही प्रकारे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास दहा लाखाची रक्कम त्यांना मिळणार आहे. पूर्वी ऊसतोडणी कामगारांना



केवळ प्रवासासाठी असलेले हे विमाकवच आता कायमस्वरूपी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाने घेतला आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यात बरेच साखर सहकारी कारखाने आहेत. ऊसतोड कामगार या कारखान्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. मराठवाडा, विदर्भ या भागातील दहा जिल्ह्यातून ऊसतोड कामगार कारखान्यांवर कुटुंबासह ऊसतोडणीसाठी येत असतात. पूर्वी या कामगारांसाठी कारखान्यांच्यावतीने केवळ येता-जाता (प्रवासासाठी) विमा संरक्षण देण्यात येत होते. तेही फक्त ३ लाख रूपये एवढे अत्यल्प होते.

विशेष म्हणजे जे कामगार सहा महिने ऊसतोडणीसाठी कारखान्यावर राबत असले तरी त्यांना इतर कोणत्याही सोईसुविधा कारखान्यांच्या व्यवस्थापन विभागाकडून देण्यात येत नव्हत्या. त्यामुळे या कामगारांचे जीवन म्हणजे अत्यंत हालाखीची होते. मात्र, आता राज्य शासनाने यामध्ये अनेक बदल केले असून या कामगारांच्या सोईसुविधासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

या महामंडळाच्यावतीने ऊसतोड कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांसाठी दहा लाख रूपयाचे विमा संरक्षण तेही कायमस्वरूपी करण्यात आले आहे. हा निर्णय नोंदणीकृत ऊसतोडणी कामगारांसाठीच लागू असणार आहे. त्यासाठी ऊसतोड कामगाराची नोंदणी तसेच महामंडळाकडील ओळखपत्र असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

> कायम उघड्यावरचे जिणे जगणाऱ्या आणि ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता कारखान्यावर राबणाऱ्या राज्यातील दहा जिल्ह्यातील ऊस तोडणी कामगारांसाठी दहा लाखाचे विमा संरक्षण कायमस्वरूपी करण्यात आले आहे. ही विमा संरक्षण योजना लागू करण्यात आली आहे.
>
> **- डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त समाजकल्याण.**

# अर्जुन तेंडुलकरचा मुंबई इंडियन्समधून पत्ता कट

✔ सुराज्य/नवी दिल्ली



मुंबई इंडियन्सच्या संघाने आता आपल्या संघात जे खेळाडू कायम राहतील, याची एक यादी जाहीर केली आहे. या यादींमध्ये सात खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. पण यामध्ये आता सचिन तेंडुलकरचा मुलगा आणि युवा वेगवान गोलंदाज अर्जुनचे नाव आहे की नाही, हे समोर आले आहे. त्यामुळे आता मुंबई इंडियन्समधून अर्जुन तेंडुलकरचा पत्ता कट झाला का, अशी चर्चा सुरु झाली आहे.

मेगा लिलावात अर्जुन तेंडुलकरला मुंबई इंडियन्स संघाने ३० लाखांची बोली लावून विकत आपल्या संघात दाखल केले होते, पण त्याला एकाही सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही. त्याचवेळी काही जणांनी अर्जुन तेंडुलकरला पुढील आयपीएलपूर्वी मुंबई इंडियन्सच्या संघाने संघात ठेवले नाही, अशी चर्चा सुरु झाली होती.

मुंबई सोडून अर्जुन गोव्याशी जोडला गेला आहे. मुंबईतील युवा अष्टपैलू खेळाडूने अलीकडेच मुंबई सोडली आणि आपल्या कारकिर्दीला नवी दिशा देण्यासाठी गोव्याकडून खेळायला सुरुवात केली. मुंबई क्रिकेटमध्ये एकापेक्षा एक प्रतिभावान खेळाडूंची फौज आहे. या स्थितीत संधी मिळत नसल्याचे पाहून अर्जुन तेंडुलकरने देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईहून गोव्याला मजल मारली आहे. अशा परिस्थितीत मुंबईचा संघ त्याला आयपीएलमध्ये कायम ठेवत नसेल, तर नवल वाटायला नको. त्याचबरोबर अर्जुनला मुंबई इंडियन्समध्ये सतत संघाचा भाग राहूनही प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळण्याची संधी मिळालेली नाही. अशा परिस्थितीत, जर तो मिनी लिलावात इतर कोणत्याही संघात सामील झाला तर कदाचित तो आयपीएलमध्ये पदार्पण करताना दिसू शकेल.

### मुंबईच्या संघाने बाहेर काढलेल्या संभाव्य खेळाडूंची यादी

मुख्यतः किरॉन पोलार्ड, फॅब एलन आणि टायमल मिल्स यांची नावे जाहीर झाली असली तरी, याशिवाय अनमोलप्रीत सिंग, मोहम्मद अर्शद खान, मयंक मार्कंडेय, संजय यादव, रमणदीप सिंग, अर्जुन तेंडुलकर, आर्यन जुयाल, आकाश मधवाल, राहुल बुध्दी आणि मुरुगन अश्विन यांची नावे प्रसिध्द झाली नाहीत, पण त्यांच्या या यादीमध्ये समावेश असल्याचे म्हटले जात आहे.

### मुंबई इंडियन्सने रिटेन केलेले संभाव्या खेळाडू

रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, डेवाल्ड ब्रेविस, ट्रिस्टन स्टब्स आणि टीम डेव्हिड आणि इशान किशन या खेळाडूंच्या नावांचा उल्लेख केला जात आहे ज्यांना मुंबई इंडियन्स संघ आयपीएलसाठी कायम ठेवू शकतो.

## राहुल गांधींनी अनुभवला रांगड्या कुस्तीचा थरार



✔ **सुराज्य/हिंगोली** : काँग्रेसची भारत जोडो यात्रा सध्या महाराष्ट्रात आहे. काल ही यात्रा हिंगोलीत दाखल झाली असून या यात्रेचा हिंगोली जिल्ह्यातील आजचा दुसरा दिवस आहे. सकाळी सहा वाजता राहुल गांधी कळमनुरीच्या दिशेने रवाना झाले आहेत. येथे मोठ्या प्रमाणात राज्यभरातील काँग्रेस कार्यकर्ते हिंगोलीत यात्रेचं स्वागत केलं आहे. यात्रेचं स्वागत करण्यासाठी कोल्हापूरवरुन दहा हजार नागरिक हिंगोलीत दाखल झाले आहेत. सर्व नागरिक लाल फेटे बांधून राहुल गांधी यांचे स्वागत केलं. तर आज राहुल गांधी यांनी कोल्हापूरकरांच्या कुस्तीचा थरार अनुभवलाय. कोल्हापूरचे आमदार सतेज पाटील यांनी या कुस्त्याचे आयोजन केले होते. राज्यातील नांदेड, हिंगोली, वाशीम, अकोला आणि बुलढाणा अशा ५ जिल्ह्यातून १४ दिवस ही यात्रा ३८४ किलोमीटरचा प्रवास करणार आहे.

कळमनुरी तालुक्यातील दातीफाटा येथून सकाळी निघालेली यात्रा आखाडा बाळापूरात पोहोचली. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विश्वजीत कदम, माजीमंत्री सतेज उर्फ बंटी पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, अमित देशमुख आदी प्रमुख नेते यात्रेत सहभागी झाले होते.

## ‘हर हर महादेव’च्या वादात राज यांची उडी

✔ सुराज्य/पुणे




'हर हर महादेव' या चित्रपटाचा वाद विकोपाला गेल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी इतिहास अभ्यासक गजानन मेंदळे यांची भेट घेण्यासाठी शनिवारी पुण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि संभाजी ब्रिगेड यांच्या चित्रपटाला विरोध असून बऱ्याच चित्रपटगृहातील शो बंद पडले आहेत. दुसरीकडे मनसेने हर हर महादेव शो सुरू करण्यासाठी संरक्षण दिले आहे. राज्यात या चित्रपटावरून राजकारण पेटलेला असताना राज ठाकरे यांची भेट महत्त्वाची मानली जाते.


याबाबत इतिहास अभ्यासक मेहेंदळे यांना विचारला असता ते म्हणाले, राज ठाकरे आमची भेट घेण्यासाठी आजच नाही यापूर्वीही येत होते. बाबासाहेब पुरंदरे हयात असताना ते त्यांची भेट घेतल्यानंतर माझी भेट घेत असायचे. राज ठाकरे यांना इतिहासाचा आणि शिवाजी महाराजांच्या अभ्यासाबद्दल कुतुवल आहे, म्हणून ते सातत्याने त्यांचे प्रश्न आमच्याकडून जाणून घेत असायचे. आज देखील त्यांनी शिवाजी महाराजांच्या इतिहासाबाबत दहा प्रश्न माझ्याकडून जाणून घेतले. अशी माहिती इतिहास अभयसक गजानन मेहंदळे यांनी माध्यम प्रतिनिधींशी फोन द्वारे चर्चा करताना दिले.

हर हर महादेव या चित्रपटाचा व्हॉइस ओवर स्वतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला आहे. हर हर महादेव या चित्रपटाच्या प्रिमियर शो साठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली होती. चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या दोन दिवसांनंतर छत्रपती संभाजी राजींनी पत्रकार परिषदे घेऊन या चित्रपटाचा संताप व्यक्त केला.

हर हर महादेव या चित्रपटामध्ये दाखवण्यात आलेला इतिहास मोडतोड करून, चुकीचा इतिहास दाखवण्यात आला आहे, असा थेट आरोप संभाजी राजे यांनी केला होता. त्यासोबत आगामी चित्रपट 'वेडात मराठी वीर दौडले सात' या चित्रपटांवरती देखील आक्षेप नोंदवला होता. या भूमिकेनंतर राज्यात 'हर हर महादेव'चा शो बंद करण्याची भूमिका राष्ट्रवादी आणि संभाजी ब्रिगेडने घेतली होती.

## जितेंद्र आव्हाड यांना मिळाला जामीन

✔ **सुराज्य/मुंबई** : माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांना जामीन मंजूर झाला आहे. १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ठाण्यातील विवियाना मॉलमधील चित्रपटगृहात सुरू असलेला हर हर महादेव' चित्रपटाचा शो बंद पाडल्याप्रकरणी ठाणे पोलिसांनी शुक्रवारी जितेंद्र आव्हाडांना अटक केली होती. आज शनिवारी न्यायालयाने आव्हाडांना जामीन मंजूर केला आहे.



जामीन मंजूर झाल्यानंतर जितेंद्र आव्हाडांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला आहे. आपल्याला किमान एक दिवस तरी तुरुंगात टाकायला पाहिजे, यासाठी षडयंत्र रचलं होतं. त्यासाठी विशिष्ट कलमं लावण्यात आली होती, असा दावा जितेंद्र आव्हाडांनी केला आहे. मला अटक करणारे वर्तकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी विनयकुमार राठोड यांचा या प्रकरणाशी शून्य संबंध आहे, असेही आव्हाडांनी म्हटले आहे.

## गुन्ह्यातील आरोपीला चार तासात अटक

✔ **सुराज्य/सोलापूर** : एमआयडीसी पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा अवघ्या चार तासात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडून शोध घेऊन आरोपीला अटक करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलीस ठाणे येथील एका गुन्ह्या संदर्भातील तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. त्यावेळी पोलीस निरीक्षक व्ही. एस. कुर्री त्यांच्या पथकाने गुप्त बातमीदाराबाबत माहिती काढून आरोपी सुधाकर दिलीप गायकवाड याला इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथून शिताफीने ताब्यात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाणे येथे हजर केले. ही कामगिरी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस निरीक्षक व्ही. एस. कुर्री, पोह. राजेंद्र बंडगर, महिला पोलीस शिपाई तृप्ती मंडलीक, रमादेवी भुजबळ, उषा मळगे, सीमा खोगरे, पोलीस नाईक महादेव बंडगर, महिला पोलीस शिपाई शैला चिकमळ, नफीसा मुजावर, अरुणा परब यांनी पार पाडली.

## चळे येथे दोन गटात मारहाण; ७ जणांविरुध्द गुन्हा

✔ **सुराज्य/पंढरपूर** : शेतातील बांधाच्या कारणावरून गायकवाड आणि मोरे यांच्या गटात चप्पल आणि काठीने झालेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर तालुका पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून ७ जणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. तानाजी वामन गायकवाड याने दिलेल्या फिर्यादीवरून संतोष चांगदेव मोरे, त्याची पत्नी मनीषा, आणि मुलगी साक्षी (सर्व रा. चळे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. त्या दोघांनी मिळून तानाजी यांना चप्पलने मारहाण केली. तर त्याची पत्नी अर्चना हिला लाथा बुक्क्याने मारहाण केली. असे फिर्यादी म्हटले आहे. तर दुसऱ्या गटातील मनीषा संतोष मोरे (वय ४२) यांच्या विरोधी फिर्यादी वरून तानाजी गायकवाड, त्याचे दोन भाऊ राजेंद्र आणि धनाजी तसेच अक्षय गायकवाड अशा चौघाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पूर्वीच्या भांडणावरून चौघांनी घरात घुसून आपल्याला काठीने मारहाण केली. असे मोरे यांच्या फिर्यादी नमूद आहे.

## ट्रॅक्टरच्या अपघातामधील जखमीचा मृत्यू

✔ **सुराज्य/सोलापूर** : ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या धडकेने जखमी झालेले प्रकाश चंद्रकांत तरटे वय (३८ रा. वाळूज देगाव ता. मोहोळ) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी सकाळी मरण पावले. ते ८ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास नरखेड येथून घराकडे निघाले होते. त्यावेळी पाठीमागून ट्रॅक्टर धडकल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांना पांडुरंग (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. या अपघाताचे प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## एसटी अडवून ड्रायव्हरला मारहाण

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : तोळणूर (ता. अक्कलकोट) येथे एसटी अडवून मारहाण केल्याने वीरभद्रप्पा सिद्रामप्पा माने (वय ५४ रा. दुधनी ता. अक्कलकोट) हे ड्रायव्हर जखमी झाले. ही घटना आज शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. ते एसटी घेऊन निघाले होते. तोळणूर येथे गडयाप्पा लच्याण याने बस अडवून त्यांना हाताने मारहाण केली. आणि त्यांना स्टेरिंग वरून खाली ओढून ड्रेस फाडला. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तरुणीने केले विष प्राशन

✔ **सुराज्य/सोलापूर** : दिवाळीच्या सुट्टीत बहिणीच्या घरी राहण्यात गेलेल्या एका अल्पवयीन तरुणीने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना शेटफळ (ता. मोहोळ) येथे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. पोखरापूर येथे राहणारी ती अल्पवयीन तरुणी दिवाळीच्या सुट्टीत शेटफळ येथे मोठ्या बहिणीच्या घरी आली होती. काल सायंकाळच्या सुमारास ती मोबाईल बघत असताना मोठ्या बहिणीने मोबाईल हिसकावून घेऊन तिला रागावले होते. त्यामुळे तिने पिकावर फवारणीचे द्रव प्राशन केली. तिला वडिलांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## ‘पवारांच्या ट्रॅपमध्ये ठाकरे अडकलेत’



✔ सुराज्य/कोल्हापूर

शरद पवार यांच्या ट्रॅपमध्ये उध्दव ठाकरे अडकले असून उध्दव ठाकरे उद्या शरद पवारांनी सांगितलं तर काँग्रेसच्या व्यासपीठावर ही जाऊन बसतील. इतके वर्ष उध्दव ठाकरे यांनी भाजपसोबत प्रचार करून विधानसभा, लोकसभा निवडणूक लढवली. मात्र, शरद पवार यांच्या सांगण्यावरून विचारांशी कॉम्प्रमाईज करून उध्दव ठाकरे राष्ट्रवादी सोबत गेले, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते शनिवारी कोल्हापुरात पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर चंद्रकांत बावनकुळे हे महाराष्ट्र दौऱ्यावर असून ते आज कोल्हापुरात म्हणजे २५ वा जिल्हा आहे संघटना मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांशी संवाद आणि समन्वय साधतं आहेत. बावनकुळे यांनी साताऱ्यात शरद पवार यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर जादूटोणा केल्याचे वक्तव्य केले होते. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधून मोठ्या प्रमाणात बावनकुळे यांच्यावर टीका झाली याबाबत त्यांना विचारले असता ते म्हणाले, उध्दव ठाकरे यांची बुध्दी भ्रष्ट करण्याचे काम शरद पवार यांनी केले आहे. मी कोणालाही वाईट भाषेत बोललो नाही. महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार मी बोललो. मात्र उध्दव ठाकरे अजूनही पवारांच्या ट्रॅपमध्ये फसले आहेत. उद्या शरद पवारांनी सांगितलं तर उध्दव ठाकरे काँग्रेसच्या व्यासपीठावर जाऊन बसतील. इतके वर्ष उध्दव ठाकरे यांनी भाजप सोबत राहून विधानसभा, लोकसभेचा प्रचार केला. मात्र, निवडणुकीनंतर उध्दव ठाकरे यांनी शरद पवारांचे ऐकत विचाराशी कॉम्प्रमाईझ करून जीवनातील मोठी चूक केली असून राज्यातील काही पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाहीत. बाळासाहेबांचे विचार सोडावे लागले तरी उध्दवजींना फरक पडत नाही. त्यांना फक्त काँग्रेस-राष्ट्रवादी पाहिजे, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

बावनकुळे हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून माझ्या या दौऱ्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश देखील होत आहेत. साताऱ्यात १२०० काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. एका बाजूला राहुल गांधी यांची यात्रा महाराष्ट्रात आणि कार्यकर्ते भाजपमध्ये अशी परिस्थिती सध्या काँग्रेसमध्ये आहे. सामान्य कार्यकर्त्यांना यात्रेचा गंध ही नाही अशी टीका भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. मागील अडीच वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसने महाविकास आघाडी सरकार हायजॅक केले होते. २०२४ पर्यंत भाजप आणि शिंदे गटाकडे मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश होणार असून महाविकास आघाडीमध्ये मोठ मोठे बॉम्बस्फोट होणार असून २०२४ ला विरोधी पक्षांना उमेदवार देखील मिळणार नाही, असा दावा बावनकुळे यांनी केला.

## माजी कृषी अधिकाऱ्याचा हवेत गोळीबार




✔ सुराज्य/बीड

परळी तालुक्यात निर्दयीपणाचा कळस गाठल्याची घटना घडली आहे. एका माजी कृषी अधिकाऱ्याच्या कृत्याने बीड जिल्हा हादरला आहे. कुत्रा भुंकला म्हणून त्याने चक्क त्याच्या जवळील बंदुकीतून कुत्र्यावर गोळीबार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. यामध्ये गंभीर जखमी झालेला कुत्रा जागीच ठार झाला आहे. ही घटना बीडच्या परळी-धर्मापुरी मार्गावर असलेल्या एका धाब्यावर घडलीय.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीवरून, परळी-धर्मापुरी मार्गावर विकास बनसोडे यांचे हॉटेल आहे. या हॉटेलवर विकास बनसोडे यांचा एक कुत्रा देखील आहे. मात्र हा कुत्रा भुंकला म्हणून हॉटेलवर आलेले माजी कृषीअधिकारी रामराज घोळवे रा. परळी याने कुत्रा भुंकत असल्याच्या कारणावरून त्यास बंदुकीच्या गोळ्या घालून निर्दयीपणे ठार मारलं. कुत्रा मोठ्याने भुंकत होता. कुत्र्याचं भुंकणं ऐकून हा अधिकारी चिडला आणि पाठलाग करत त्याच्यावर गोळ्या झाडल्या. हॉटेलच्या पार्किंगमध्ये या माजी अधिकाऱ्याने हे भयंकर कृत्य केलं आहे. कुत्र्याच्या मृत्यूमुळं संतप्त हॉटेल चालकाने या अधिकाऱ्याला जाब विचारला. या घटनेमुळं हॉटेलमधील कर्मचारीही धास्तावले आहेत.

## दोन वर्षांत ५५ माओवाद्यांना कंठस्नान

✔ सुराज्य/गडचिरोली


मागील दोन वर्षांत माओवादविरोधी अभियानात जिल्ह्यात सात मोठ्या चकमकी झाल्या. या चकमकींमध्ये तब्बल ५५ माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात पोलिस विभागाला यश आले. तर १९ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. कारवाईदरम्यान पोलिसांनी १४ माओवाद्यांना अटक केली आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे दंडकारण्यात माओवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

किसनेली येथे १८ ऑक्टोबर २०२० मध्ये चकमक झाली होती. तत्कालीन अतिरिक्त पोलिस अधीक्षक मनीष कलवानियाच्या नेतृत्वात या चकमकीत पाच माओवादी ठार झाले होते. त्यानंतर २९ मार्च २०२१ रोजी खोब्रामेंढा येथील चकमकीत पाच माओवादी ठार झाले. गोरगुट्टा आणि मोरचुल चकमकीत प्रत्येकी दोन माओवादी ठार झाले. २१ मे २०२१ रोजी पैडी येथील चकमकीत १३ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला.

## तीन महिन्यांतच गडकरींवर मोठी जबाबदारी

✔ सुराज्य/नवी दिल्ली

गुजरातमध्ये पुढील महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. भारतीय जनता पक्ष राज्यात गेल्या २७ वर्षांपासून सत्तेत आहे. भाजपनं या राज्यात अनेक प्रयोग केले आहेत. भाजपची प्रयोगशाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुजरातमधील सत्ता टिकवण्यासाठी पक्ष नेतृत्त्वानं सर्वस्व पणाला लावलं आहे. गेल्या निवडणुकीत भाजपला १०० चा आकडा गाठता आला नव्हता. काँग्रेसच्या मुसंडीनं भाजपच्या जागा कमी झाल्या. त्यामुळे यंदा भाजपनं गुजरातमध्ये जोर लावला आहे. निवडणुकीसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे.



भाजपकडून गुजरात निवडणूक जाहीर करण्यात आलेल्या स्टार प्रचारकांच्या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरींच्या नावांचा समावेश आहे. ऑगस्टमध्ये भाजपनं संसदीय बोर्डात बदल केले. नितीन गडकरी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांची नावं बोर्डातून वगळण्यात आली. यानंतर गडकरींनी केलेली काही विधानं चर्चेत होती. मोदींच्या मंत्रिमंडळात गडकरींना साईडलाईन केलं जात असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. आता भाजपनं गुजरात निवडणुकीसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. त्यात गडकरींसह केंद्रातील निवडक मंत्र्यांचा समावेश आहे. पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांचंही नाव यादीत आहे. स्टार प्रचारकांची एकूण संख्या ४० इतकी आहे. गुजरात भाजपचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा आणि स्मृती इराणी यांच्या नावाचा समावेशदेखील यादीत आहे. काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा समावेशदेखील स्टार प्रचारकांच्या यादीत करण्यात आलेला आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुजरात निवडणुकीत पक्षाचे स्टार प्रचारक असतील.

## किंग चार्ल्सवर अंडी फेकली



✔ सुराज्य/लंडन

यॉर्क शहरात किंग चार्ल्स आणि क्वीन कंसोर्ट कॅमिला यांच्यावर अंडी फेकल्याबद्दल पोलिसांनी २३ वर्षीय पॅट्रिक थेलवेलला अटक केली होती. आता त्याला अनोखी शिक्षा सुनावण्यात आली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवणे आणि शांतता भंग केल्याच्या आरोपाखाली पॅट्रिकला अटक करण्यात आली होती.

यूके वेबसाइट 'द मिरर'मध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार, किंग चार्ल्स आणि त्यांची पत्नी कॅमिला यांच्यावर अंडी फेकल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला सार्वजनिक ठिकाणी अंडी नेण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर त्याला भविष्यात किंग चार्ल्सपासून ५०० मीटर दूर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### सोशल मीडियावर बनला खलनायक

न्यायालयात आपले स्पष्टीकरण सादर करणाऱ्या आरोपीने जमावाने त्याला प्रक्षोभित केल्याचं सांगितलं. आपल्या या चुकीनंतर आपल्याला जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचंही त्याने सांगितलं. पोलिसांनी पॅट्रिकची चौकशी केली आणि जामीन मिळाल्यानंतर त्याची सुटका केली. सुटका झाल्यानंतर यॉर्क युनिव्हर्सिटीमधील पॅट्रिक या विद्यार्थ्याने सांगितले की, 'माझ्यावर जमावाने हल्ला केला. लोकांनी मला खलनायक बनवले.

## ‘संगमेश्वर’मध्ये सोलापूर स्टार्ट-अप यात्रेचे आयोजन

✔ **सुराज्य/सोलापूर** : संगमेश्वर कॉलेजमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठा तर्फे संपूर्ण दिवसभर स्टार्टअप यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण व्यवसाय संकल्पना व नव उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासाकरिता पूरक वातावरण निर्मिती करणे असून त्यातून यशस्वी उद्योजक घडवण्यासाठी विद्यापीठातील इनक्युबेशन केंद्रातर्फे सोलापूर स्टार्टअप यात्रा संगमेश्वर महाविद्यालयामध्ये आयोजित केली आहे.

संगमेश्वर महाविद्यालयामधील वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. वंदना पुरोहित या उपक्रमाच्या समन्वयक असून सोलापूर परिसरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, कर्मचारी व शहरवासीयांना आवाहन करण्यात येते की, या स्टार्टअप यात्रेत सहभागी होऊन आपल्याकडे असलेल्या व्यवसाय संकल्पनेचे सादरीकरण करावे. सहभागी विद्यार्थी व नव उद्योजकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून प्रशिक्षण व अनुदान मदत देखील विद्यापीठाकडून देण्यात येणार आहे. तरी सोलापूरकरांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई यांनी केले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी समन्वयक डॉ. वंदना पुरोहित, डॉ. आर. एम. खिलारे यांच्याशी ९८२२७२४०११, ९४२०५ ४६६९५ या नंबरवर संपर्क साधावा.





# ‘भारत जोडो’मुळे सोलापुरी काँग्रेस ‘चार्ज’

**अजित उंब्रजकर**

राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. ही भारत जोडे यात्रा सध्या महाराष्ट्रात आली आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या वतीने १७ नोव्हेंबर रोजी अकोला येथे या यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे. या यात्रेच्या निमित्त काँग्रेसमधील सर्व पदाधिकारी, सर्व फ्रंटलचे अध्यक्ष महिला आघाडीसह अनेक नेते विविध पातळ्यांवर यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. एक प्रकारे या भारत जोडो यात्रे निमित्त सोलापूर शहर जिल्ह्यातील काँग्रेस चार्ज झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

काश्मीर ते कन्याकुमारी भारत जोडो यात्रा राहुल गांधी यांनी सुरू केली आहे. सुमारे ३ हजार किलोमीटर पर्यंतचा हा प्रवास आहे. सध्या ही यात्रा महाराष्ट्रात आली आहे. या यात्रेचे महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. सोलापूर शहर जिल्ह्याच्या वतीने १७ नोव्हेंबर रोजी यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे. त्यासाठी सोलापूर शहर जिल्हा काँग्रेसने ‘चलो अकोला’चा नारा दिला आहे. शहर जिल्ह्यातून सुमारे १५ हजार पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ते नेण्याची नियोजन काँग्रेसकडून करण्यात येत आहे. या पदयात्रेसाठी आमदार प्रणिती शिंदे यांच्या शहराध्यक्ष प्रकाश वाले, जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्यासह अनेक नेते मेहनत घेताना दिसत आहे.



या यात्रेसाठी काँग्रेस महिला काँग्रेस, युवक काँग्रेससह सर्व विभागाचे पदाधिकारी प्रयत्न करत आहेत. प्रत्येक प्रभागात, प्रत्येक वॉर्डात स्वाक्षरी मोहीम घेण्यात येत आहे. काँग्रेस भवनमध्ये रोज नियोजनासाठी बैठका घेण्यात येत आहेत. प्रत्येकाला आपापली जबाबदारी वाटून देण्यात आली आहे. शहरातील प्रत्येक नगरसेवक किमान पाच गाड्या करणार असून यामध्ये जास्तीत जास्त कार्यकर्ते नेण्याचे नियोजन आहे. स्वतः शहराध्यक्ष प्रकाश वाले हे दहा गाड्यांचे नियोजन करत आहेत. आमदार प्रणिती शिंदे यांनीही भारत जोडो यात्रा यशस्वी करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केल्याचे दिसत आहेत. प्रत्येक प्रभागात जाऊन नगरसेवकांची भेट घेणे, बैठका घेणे त्यांना नियोजन सांगणे, कार्यकर्त्यांना नेण्यासाठी व्यवस्था करणे यासह अनेक सूचना त्या देताना दिसत आहेत. जिल्ह्याचा विचार करता दक्षिण तालुक्यातून कार्याध्यक्ष सुरेश हासापुरे यांनीही तगडे नियोजन केले आहे. दक्षिण तालुक्यातील सुमारे दोन हजार कार्यकर्ते नेण्याची नियोजन हसापुरे स्वतः केले आहे. याशिवाय जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनीही जिल्ह्यात आपली स्वतंत्र यंत्रणा राबवली आहे. प्रत्येक तालुक्यातील किमान हजार हजार कार्यकर्ते येतील, असा प्रयत्न त्यांच्याकडून सुरू करण्यात आला आहे.

BHARAT JODO YATRA

### सोलापूरची संस्कृती

**भारत जोडो यात्रेत अकोला येथे काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते राहुल गांधी यांच्यासमोर सोलापूरची संस्कृती सादर करण्यात करणार आहेत. शहरातील सिद्धेश्वर यात्रा, पंढरीतील आषाढी एकादशी, अक्कलकोटचे महात्म्य, बार्शीतील भगवंत तसेच मंगळवेढ्यातील संत दामाजी पंतांचे महात्म्य काँग्रेसचे पदाधिकारी सांगणार आहेत तसेच अनेक काँग्रेसचे पदाधिकारी बाराबंदीच्या वेशातही राहुल गांधी यांचे स्वागत करण्यात करणार आहेत. माजी नगरसेवक चेतन नरोटे हा सोलापूरचा पारंपरिक लेझीमचा खेळ सादर करण्यासाठी अनेक कार्यकर्ते घेऊन अकोल्याला जाणार आहेत.**

### मुंबईत प्रा. कुलकर्णींवर मिडीयाची जबाबदारी

या यात्रेसाठी अनेक कार्यकर्ते सोलापूर शहरातून तर अनेकजण मुंबईमधून प्रयत्न करत आहेत. वरिष्ठ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रदेश प्रवक्ते प्रा. मनोज कुलकर्णी यांना मुंबईमधून संपूर्ण मीडिया हाताळण्याची जबाबदारी दिली आहे. त्यांच्या सूचनेनुसार कुलकर्णी हे मुंबईमधून यात्रेचे नियोजन मीडियासमोर सांगत आहेत.

# ‘भीमा’ ने ओलांडल्या राजकीय ‘सीमा’



भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमुळे पंढरपूर, मोहोळ तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असले तरी भीमा ने राजकीय सीमा ओलांडल्या असल्याची चर्चा मात्र जिल्ह्यात रंगताना दिसत आहे. भीमा सहकारी साखर कारखाना निवडणुकीची प्रचार धुमाळी जिल्ह्याने अनुभवली रविवार दि १३ रोजी या कारखान्यासाठी मतदान होत असले तरी राजकीय पक्ष विरहित झालेल्या या निवडणुकीमुळे भविष्यातील राजकीय गणिते मात्र बिघडणार आहेत.

भाजपा, राष्ट्रवादी अशा विविध पक्षांची सांगडा सांगड करून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या नेत्यांनी सहकारात पक्षीय राजकारण बाजूला ठेवले असले तरी यामुळे भविष्यात या नेत्यांच्या एकमेकातील अडचणी मात्र वाढणार आहेत. माजी आमदार राजन पाटील हे जरी राष्ट्रवादीचे असले तरी भाजपाच्या प्रशांत मालकांसोबत त्यांनी भीमा बचाव पॅनल काढून निवडणूक रिंगणात ते उतरलेले दिसतात तर दुसरीकडे भाजपाचे खासदार असणारे धनंजय (मुन्ना) महाडिक यांना ताकद देण्यासाठी राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील मैदानात उतरलेले दिसतात. त्यामुळे भिमाच्या निवडणुकीत रंगत निर्माण झाली असली तरी याचा या दोन तालुक्यातील भविष्यात येणाऱ्या निवडणुकांवर परिणाम दिसणार आहे. टोकाची भाषणे, राजकीय उणीदुणी, वैयक्तिक पातळीवर टीका यामुळे भविष्यात एकमेकावर झालेल्या टीका हे नेते विसरणार नाहीत आणि यातून पाडापाडीच्या राजकारणाला उधाण येईल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यातच येथील राजकारणात लक्ष घालणार असल्याचे खा.महाडिक यांनी वक्तव्य केल्याने आगामी निवडणुकात याचे पडसाद उमटणार आहेत.

### भविष्यातील निवडणुकांत होणार नेत्यांची गोची....

आता भविष्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादी पक्ष म्हणून माजी आमदार राजन पाटील आणि प्रवक्ते उमेश पाटील हे एका स्टेजवर येतील का? हा खरा प्रश्न आहे. कारण दोघांनीही एकमेकांचा या कारखाना निवडणुकीच्या निमित्ताने भरपूर समाचार घेतला आहे तर दुसरीकडे मोहोळ तालुक्याच्या राजकारणात खा.महाडिक राष्ट्रवादीच्या विरोधात उतरले तर उमेश पाटील यांची भूमिका काय असेल..आणि खा.महाडिक उतरणारच आहेत असे त्यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यामुळे पुढील राजकारण कसे असेल हे सांगणे कठीण आहे. इकडे परिचारक कुटुंब आणि महाडिक कुटुंब हे दोघेही भाजपात आहेत.मग परिचारक मोहोळच्या मालकाला सपोर्ट करणार काय? या नंतरच्या काळात घडणाऱ्या गोष्टी असल्या तरी या निवडणुकीच्या निमित्ताने अनेक प्रश्न उभे राहिले आहेत याची उत्तरे भविष्यात नक्की मिळतील.

# परिपक्व राजकारण आता वेगळ्या वळणावर

**सचिन आपसिंगकर**



न्यायालयीन याचिकांवर निर्णय झाल्यानंतर लवकरच आगामी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाचा फैसला होणार आहे. बार्शी तालुक्यात बाजार समितीच्या निवडणुकीलाही केवळ ९ महिने उरले आहेत. तालुक्याचे राजकारण या निमित्ताने ढवळले जाणार आहेत. यासर्व मिनी विधानसभा निवडणुकांच्या निकालांवर आगामी विधानसभा निवडणुकीची समीकरणे ठरणार आहेत. त्यामुळे या निवडणुकात सर्वच राजकीय पक्षांची ताकद लागणार पणाला लागणार आहे.

बार्शी तालुक्यात गेली २५ वर्षे कायम प्रत्येक निवडणुकीत राजकीय संघर्ष ठरलेला आहे. त्यामुळे भविष्यातल्या निवडणुकासुद्धा प्रत्येकाच्या राजकीय ताकद आणि कौशल्याची परिक्षा पाहणाऱ्याच ठरणार आहेत. बार्शी तालुक्यात सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रणित बाळासाहेब यांची शिवसेना या पक्षाचे नेते म्हणून भाऊसाहेब आंधळकर आहेत. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या पक्षात माजी मंत्री दिलीप सोपल आहेत. विद्यमान आमदार राजाभाऊ राऊत हे भारतीय जनता पक्षाचे समर्थक अपक्ष आमदार आहेत. त्याचप्रमाणे महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे हे देखील भारतीय जनता पक्षामध्येच आहेत. राष्ट्रवादीला माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांचा चेहरा मिळाला आहे. बार्शीत काँग्रेसला शहराध्यक्ष विजय साळुंखे हे नेतृत्व लाभले आहे. बार्शी तालुक्यात सर्वच राजकीय पक्षांचे प्रतिनिधीत्व आहे. आगामी निवडणुकांमध्ये मविआ विरूध्द भाजपा असा सामना रंगणार की- स्थानिक आघाड्यांचे राजकारण जन्माला येणार याबाबत विविध तर्क वितर्क केले जात आहेत. बार्शी तालुक्यात निवडणुकांच्या तोंडावर मोठे राजकीय निर्णय घेतले जातात. आज याबाबत भाकीत वर्तवता येणार नाही. मात्र सध्या प्रत्येक स्थानिक निवडणुकांमध्ये सर्वच राजकीय पक्षाचे बडेनेते पाठबळ देताना दिसतात. बार्शी तालुक्यातील आगामी निवडणुकांमध्ये कोणत्या फॉर्म्युला आणि अजंड्याला महत्व दिले जाते याबाबत उत्सुकता आहेच. नुकतेच झालेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेने तालुक्यात मोठी वातावरण निर्मिती केली. या सभेत आमदार राउत यांनी विकास कामांच्या मुद्दयालाच सर्वाधिक महत्व दिले. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्येही विकास कामांच्याच मुद्दयाची चर्चा रंगण्याची शक्यता जास्त आहे.




### मुद्दा गुद्द्यांवरही येईल?

तालुक्याचे राजकारण आता एका विशिष्ट वळणावर येवून ठेपले आहे. अधून मधून कलगीतुरा होतो. निवडणुका नसताना शितयुध्द आरोप प्रत्यारोप, शह -काटशह यांचे राजकारण सुरूच असते. बार्शी तालुक्याचे राजकारण कायम प्रवाही आणि तप्त आहे. सर्वच क्षेत्रांवर राजकारणाचे पडसाद कायम उमटताना दिसतात. मात्र, आता काळाचे संदर्भ बदलले आहेत. विकासाचा मुद्दा ज्वलंत आणि जास्त केंद्रबिंदु ठरताना दिसतो आहे, हे महत्वाचे आहे. त्यामुळे बार्शीचे राजकारण आता परिपक्व झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. मात्र हे चित्र कधी बदलेल आणि नेते मंडळी मुद्यांवरून गुद्द्यांवर कधी येतील हे सांगता येत नाही.

### राजकीय घडामोडींकडे तालुक्याचे लक्ष


जवळपास सत्ताकेंद्रामधील लोकनियुक्त सदस्यांचा कालावधी संपुण १० महिने होत आले आहेत. सध्या तालुकावासीय प्रशासकीय सत्ता अनुभवत आहेत. निवडणुकांच्या आखाड्यात उतरणाऱ्या इच्छुकांची भाऊ गर्दी वाढू लागली आहे. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाच्या नेत्यांना आपले बळ दाखवून देण्यासाठी भविष्यात वेगवेगळे पवित्रे घ्यावे लागणार आहेत आणि त्या दृष्टीनेच काय घडामोडी होतात याकडे तालुकावासीयांचे लक्ष आहे.

# काकांचा घाव बसतो वर्मी

**विष्णू सुरवसे**

सध्या प्रशासनावर पदाधिकाऱ्यांची पकड नसल्याने अधिकारी सैरभैर झाले आहेत, याची प्रचिती सोलापूरवासियांना आलेली आहे. त्यातच भर म्हणून उत्तर सोलापूर तालुक्यातील एका शिक्षिकेने एका गट शिक्षणाधकाऱ्याबद्दल लेखी तक्रार राष्ट्रवादीचे जिल्हाअध्यक्ष बळीरामकाका साठे यांच्याकडे केली. त्यानंतर काकांनी थेट स्वामींची भेट घेऊन त्रागा केला. प्रशासन खडबडून जागे झाले. नेमका प्रकार काय आहे, तो कोणालाही कळेना. मात्र असे प्रकार रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. ती काकांनी केल्याने समाधान व्यक्त केले जाते आहे.

एक जबाबदार अधिकारी असे वर्तणूक करू शकतो का? असा प्रश्न संपूर्ण तालुकावासीयांना पडला. त्यामुळे काकांचा घाव ‘प्रताप’ केलेल्या अधिकाऱ्याच्या जीवाला लागला, अशी चर्चा तालुक्यात सुरू झाली. अपशब्द वापरून त्या महिलेच्या (शिक्षिकेचा) व स्वतः च्या प्रतिमेस काळिमा फासण्याचा प्रयत्न झाला कसा अशी चर्चा सुरू झाल्यावर झोपी गेलेल्या त्या प्रतापी अधिकाऱ्याचे डोळे खाडकन उघडले. मी काही केले नाही असे तो आपला बचाव करू लागला. शासन निर्णयाचा वापर करून कर्तव्य केले. मी धुतल्या तांदळा सारखा आहे,असा आव तो आणू लागला. यातच स्वामी साहेबांनी देखील कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. मग तो प्रशासन व जनतेच्या दृष्टीने योग्यच ठरणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. भ्रष्टाचार, गैरवर्तूणूक लाच असे प्रकार रोखण्यायासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या खालील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. ते काम काकांनी केलं असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.



# शहाजीबापूंना नामोहरम करण्यासाठी देशमुख अस्त्राचा प्रयोग



**डी.एस.गायकवाड**

राजकीय बुद्धिबळाच्या खेळात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी एक डाव टाकत सांगोला तालुका दौरा करून आमदार शहाजीबापू पाटील यांचा देशमुख कुटुंबीयांना भेटून केलेल्या बंदोबस्ताची चाल भविष्यातील राजकारणात परिणामकारक ठरणार असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात घर करून राहिली आहे. सांगोला तालुक्याच्या राजकारणात नेहमीच शेकापचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे.१९९५ आणि गतकाळातील निवडणुकीचा अपवाद वगळला तर नेहमीच या तालुक्यावर शेतकरी कामगार पक्षाने आपले वर्चस्व राखले आहे. अगदी पूर्वीपासून या तालुक्यात शेकापची ताकद मोठी समजली जाते. स्व. गणपतराव देशमुख यांनी या तालुक्याचे नाव आपल्या कर्तृत्वातून आणि आदर्श वर्तणुकीतून अगदी देशभर उंचावले. आजही तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते स्व. देशमुख यांच्या मार्गावरून मार्गक्रमण करीत असताना राजकारण समाजकारण करताना दिसतात. अशा अवस्थेत सांगोला तालुक्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी शिवसेनेतील बंडाळीत सहभागी होत ‘काय झाडी.. काय डोंगर.. समंद ओके’ मध्ये.. असे म्हणत महाराष्ट्राच्या राजकारणात सेलिब्रिटी म्हणून नाव कमावले. यावरच ते थांबले नाहीत तर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडत सभा गाजविल्या. यावर राष्ट्रवादी, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून संतप्त प्रतिक्रिया देखील ऐकावयास मिळाल्या. याच टीका टिप्पण्या आता आ. बापूंना भोवणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत.



याकामी शहाजीबापू यांचा राजकीय बंदोबस्त करण्यासाठी शिवसेना सरसावल्याचे दिसत असून नुकताच आदित्य ठाकरे यांनी सांगोला तालुका दौरा करीत या दौऱ्यात देशमुख यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेताना देशमुख कुटुंबियांशी त्यांनी जवळीक साधत संवाद साधला. शहाजीबापूंचा पाडाव करायचा असेल तर राष्ट्रवादीसोबतच आहे पण त्यापुढे जाऊन आदित्य ठाकरे यांनी सांगोला तालुक्यात वर्चस्व असणाऱ्या शेकापला खुणावले आहे. त्यामुळे ठाकरे यांनी शहाजीबापू यांचा भविष्यातील अचूक बंदोबस्त केला असल्याची चर्चा सध्या जिल्ह्याच्या राजकारणात रंगताना दिसत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि शेकाप पक्षाच्या माध्यमातून शहाजीबापू यांचा गेम ओव्हर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. राष्ट्रवादीची भक्कम साथ मिळाल्याने गत विधानसभा निवडणुकीत शिवसेना पक्षाच्या चिन्हावर शहाजीबापू पाटील यांनी अगदी काटावर का असेना आमदारकी मिळवली. राष्ट्रवादीची मते निर्णायक आहेत पण बापूंनी पवारांवर केलेल्या टिकेमुळे राष्ट्रवादी भविष्यातील विधानसभा निवडणुकीत शहाजीबापूंना साथ देईल असे वातावरण नाही हे जाणूनच कोणत्या का पध्द्तीने असेना आ.बापू हे पडले पाहिजेत याच उद्देशाने आदित्य ठाकरे यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेत ही खेळी खेळल्याची चर्चा आहे.

### जेरीस आणण्याचा डाव

**देशमुख अस्त्राचा वापर करीत आदित्य ठाकरे यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांना जेरीस आणण्याचा डाव टाकला असून यामुळे भविष्यात बापूंना सांगोल्याचे रणांगण जिंकण्यासाठी पराकोटीचा संघर्ष करावा लागणार आहे.**



# वैरागकरांच्या आशा सुकल्या...

**निलेश उबाळे**





बार्शी तालुक्यातील सर्वात मोठे गाव अन् ग्रामपंचायत अशी ओळख असलेल्या वैरागचे सर्व पक्षीय पाठबळामुळे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाले अन् सर्व वैरागकरांच्या आशा अजून पल्लवीत झाल्या. मात्र ज्या वैराग शहराने आजी-माजी आमदारांना नाकारून स्थानिक नेत्याला प्रोत्साहन दिले, त्या वैराग शहरात नगरपंचायत झाल्यापासून ठोस कामे होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये चलबिचल दिसून येत आहे. डिसेंबर २०२१ मध्ये निवडणूक आयोगाने निवडणूकही घेतली. या निवडणुकीला दोन्ही बार्शीकर नेत्यांनी आपले सर्वस्व पणाला लावून वैराग येथे ठाण मांडून बसले होते.

परंतु चाणाक्ष वैरागकर मतदारांनी मात्र स्थानिक नेते निरंजन भूमकर यांना संधी दिली. भूमकरांनी गत वेळी राष्ट्रवादीच्या तिकिटावर विधानसभा लढवली होती. त्यामुळे वरच्या नेत्यांकडे त्यांचे बऱ्यापैकी कनेक्शन जमले होते आणि महाराष्ट्रात महाआघाडीची सत्ताही होती. या सर्व गोष्टींचा फायदा घेऊन निरंजन भूमकर यांनी विकास कामांसाठी पाठपुरावा आणि प्रस्ताव यांचा धडाका सुरू केला आणि त्याला काही प्रमाणात यशही आले. नंतर राज्यात सत्ता बदल झाले आणि ठाकरे व पवारांचे सरकार जाऊन फडणवीस आणि शिंदे यांचे सरकार आले आणि मग काय मागील सर्व निर्णयांवर स्थगिती आली, वैरागला येणारा सर्व निधी थांबला, वैराग नगरपंचायत झाल्यानंतर पल्लवीत झालेल्या वैरागकरांच्या आशा मात्र काही प्रमाणात सुकल्या, आता नवीन सरकारकडून आपल्या शहराला निधी मिळेल का हा प्रश्न अनेकांना भेडसावत असला तरी भूमकर यांचा प्रयत्न सुरूच आहे.

दुसरीकडे मोहोळ - वैरागचे माजी आमदार चंद्रकांत (नाना) निंबाळकर यांचा वारसा असणाऱ्या संतोषदादांनी नगरपंचायतीला अपयश आल्यानंतर आता ग्रामीण भागात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मोर्चे बांधणी सुरू केल्याचे पहायला मिळते.

### राऊत यांना लक्ष घालावे...

**तालुक्याचे आमदार राजेंद्र राऊत यांनी जिल्ह्यावर वर्चस्व ठेवत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी जवळीक साधली आहे. या जवळकीचा फायदा संतोष निंबाळकर वैराग भागासाठी कसा उचलतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तालुक्याचे आमदार असल्यामुळे राजेंद्र राऊत यांना वैराग नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये देखील लक्ष घालावे लागणार आहे. गतवेळी विधानसभा निवडणुकीत वैराग भागाचा उमेदवार असताना देखील खेडो पाड्यातून राऊत यांना लीड मिळाला आहे, हे मात्र नक्की त्यामुळे आमदार साहेबांना नगरपंचायत आपली नसली तरी लक्ष घालावे लागणार आहे.**